
■ वर्ष:६वे
■ अंक: १ ला
■ जाने-फेब्रु.२०२१
■ किंमत: ७० रूपये
मासिक
शिक्षणयात्री
इगा










www.shikshanyatri.com **शिक्षणयात्री संकेतस्थळ उद्घाटन ...**

## शुभेच्छा संदेश...



*शिक्षणयात्री हा अंक म्हणजे विद्यार्थी, पालक, शिक्षक, या सर्वांना लाभलेली पर्वणीच होय ! समाजाला जागृत करण्याचे उत्तम कार्य आपण या अंकाद्वारे करीत आहात. जीवन शिक्षणा द्वारे,, शिक्षणा बद्दलची कळकळ असलेले, अनुभवी, व नवोदित लेखकांना देखील आपण एक उत्तम व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. समाजाप्रती असलेले आपले कर्तव्य, शिक्षण क्षेत्रातील विविध प्रकारच्या समस्यांना, संशोधन करून त्यासंबंधी चे उपाय, नियोजन करून ,लेखकांना लिहिते होण्याची, शिक्षणयात्री ने सुवर्ण संधी उपलब्ध करून दिली. शिक्षकांच्या मनातील भाव भावना, त्यांनी केलेले नवनवीन प्रयोग या सर्व प्रकारच्या उपक्रमांना, लोकांसमोर सादर करून, आपल्यातील क्षमता दाखवण्याची सुद्धा एक छान संधी आपण दिली आहे. शिक्षक जर शिक्षण यात्री असेल, तर तो ही वारी नक्कीच ,समाजाला मार्गदर्शन करून पुढील पिढी घडविण्यासाठी सतत प्रयत्न करीत रहाणार.त्यांच्या कर्तुत्वाला वाव मिळावा म्हणून एक चांगले ,साधन आपण उपलब्ध केले आहे, त्यामुळे अनेक विद्यार्थी, पालक आणि इतर वंचित घटक यांना त्याचा उपयोग करून प्रगतीची शिखरे गाठणे शक्य होत आहे, आपणास हे कार्य अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी, समाजाला दिशा देण्याचे कार्य करण्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !*


**डॉ.मीना कुटे**

प्राचार्य/कुलसचिव(प्रभारी)
श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी
महिला विद्यापीठ, मुंबई

संपादकीय...



# रूळावर येतांना...

गेल्या मार्चपासून सुरू झालेल्या संकटातून आता कुठे सारे सावरायला लागले आहेत. २०२० च्या सुरूवातीला असे काही 'लॉकडाऊन' असू शकते असा पुसटसा विचारही मनी आला नव्हता. नव्हे तर 'लॉकडाऊन'या शब्दाचा परिचय देखील नव्हता. मात्र आता 'लॉकडाऊन 'उच्चारले तरी अंगावर काटा आल्याशिवाय रहात नाही.

मार्च २०२० ते डिसेंबर २०२० या नऊ महिन्याच्या काळात सुरवातीचे काही दिवस बंदिस्त जीवन अनुभवले. घरी रहा हा मूलमंत्र कठीण होऊन बसला. सारे काही बंद अशावेळी सर्वच क्षेत्राला फटका बसला. आर्थिक नुकसानी बरोबर मानसिकताही ढळू लागली. जून जुलै पासून हळूहळू, टप्प्या टप्प्याने व्यवहार सुरू होऊ लागते आणि आता कुठे सारं सुरळीत होतांना दिसतेय. करोना लसीकरणही सुरू झालेय तरी करोनाचे संकट पुर्ण संपल्याचे दिसत नाही.

अशा काळात ' शिक्षणयात्री ' मासिकाचा मुद्रित अंक देणे शक्य झाले नाही. मात्र ई-अंक देण्याचा प्रयत्न केला. अंक कधी मिळेल अशी सतत विचारणा सुरू होती. पण आर्थिक समस्या आ वासून उभी असतांना काय करावे असा प्रश्न होता. पण थांबून चालणार नव्हते. म्हणूनच २०२१ या नववर्षात मुद्रित अंक देण्याचा प्रयत्न करीत आहोत. अर्थात आपल्या सहकार्याच्या अपेक्षेवरच सकारात्मक प्रयत्न करीत आहोत आणि आपला स्नेह, मदत, सहकार्याचा त्रिसुत्री बळावर 'मासिक शिक्षण यात्री' चे गाडे रूळावर येईल अशी आशा आहे.

सुभाष कुलकर्णी
संपादक

# अंतरंग


**मुलांची समज आणि मातृभाषा**
रेणू दांडेकर / ३

**जबाबदार पालकत्व**
डॉ.ह.ना.जगातप / ३

**एक न सुटलेले गणित**
डॉ.विजय पांढरीपांडे / ३

**इगा**
सुनिल मोरे/ ३

**सभापती लेख**
सत्तरसिंग पावरा / ३

**सुचले म्हणून**
अंजली देशपांडे/ ३

**सुवर्ण महोत्सव ज्ञान माऊलीचा**
युवराज माने / ३

**विलक्ष कीटक**
डॉ.नंदा हरम / ३

**लॉकडाऊन- शैक्षणिक प्रयत्न**
चेतन पाटील/ ३

**अनुभव- लॉकडाऊनचे**
सिमा बाविस्कर / ३

**आत्मचिंतनाचे सरते वर्ष**
श्याम गायकवाड / ३

**यशोगाथा-माझ्या शाळेची**
देविदास महाले / ३

**यशोगाथा-माझ्या शाळेची**
किरण पाटील/ ३

**भारतीय अस्मिता**
मयुरी पाकळे/ ३

**भारतीय राजमुद्रा**
देविदास निळे/ ३



मार्गदर्शक
**मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)**

मानद संपादक
**सुभाषदादा कुलकर्णी**

उप संपादक
**संदेश नंदकिशोर हजारे**

संपादन सहाय्य
**डॉ.दिपक बाविस्कर**
**डॉ.युवराज पवार**

अंक जुळणी
**प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे**

मुद्रितशोधन
**डॉ.युवराज पवार**

मुखपृष्ठ मांडणी
**साभार आंतरजाल**

कार्यालय प्रमुख
**जगदीश पाटील**

**समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...**

मासिक
# शिक्षणयात्री

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

वर्ष : ६वे अंक: १ ला जानेवारी/फेब्रुवारी २०२१ जोडअंक

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-**
**त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
**Online** पेमेंट साठी - खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे
संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री
क्रांतीनगर मु.पो.ता.-शिरपूर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

**प्रतिनिधी सहाय्य**
**पुणे-** रमेश काळे,
**मुंबई-** जयपाल गिरासे,
**नाशिक-**किरण पाटील,
**सोलापूर-** उमेश काळे,
**औरंगाबाद-** रवि गारूडकर,
**परभणी-** युवराज माने,
**जळगांव-** प्रविण माळी,
**नंदुरबार-** तुकाराम धनगर,
**अमरावती-** रूपेश माने,
**कोल्हापूर -** गुलाब बिसेन,
**सातारा -** विनोद भोजने,
**बीड -** अनंत दिक्षित,
**लातूर -** पंढरीनाथ चिभडे,



**लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.**

# मुलांची समज आणि मातृभाषा



रेणू दांडेकर
दापोली, रत्नागिरी

> “इथे आपण पाठ्यपुस्तकाबरोबर वेगळी पुस्तके, शैक्षणिक वातावरण, साधनसामुग्री बनवूया. अनेक संस्था असा प्रयत्न करतांना दिसतात. अशीच एक संस्था मी राजस्थानमध्ये पाहिली. त्यांची स्वतःची पुस्तके आहे. ती तयार करण्या मागे त्यांची विचार दृष्टी आहे. शाळेतील सगळ्या समूहाने मिळून ती तयार केली आहेत. गोष्टीची पुस्तके (१३ भाग), अपनी पोथी(४ भाग), मातृभाषा पुस्तक(४ भाग) अशी पुस्तके तयार करणाऱ्या संस्थेचे नाव आहे. ‘दिगंतर’ ही संस्था गेली २०-२५ वर्षे भाषेवर वेगळे काम करत आहे. जयपूर स्थित ही संस्था पाठपुस्तक (म्हणूया) ४ भागात करताना कोणता दृष्टीकोन ठेवते?”

मूल आपल्या आजूबाजूच्या अनेक गोष्टी समजून घेऊ लागते, यात माणसं, माणसांचं बोलणं, वागणं, आजूबाजूच्या वस्तू निसर्ग आणि सर्वच गोष्टी असतात. एका अर्थाने हे समजून घेणं म्हणजेच त्यांच त्यांच शिकणं असतं. कशाला काय म्हणतात. कशाला काय म्हणतात हे समजून घेणं असतं. जिथे अडेल तिथे मूल विचारतं. मोठी माणसं सहजतेने सांगतात. हे सांगणं हे ही शिकवणंच असतं. मोठ्या माणसांनाही असं काही वाटत नाही की, आपण काही शिकवतोय. हे आपोआप घडतं, सहज घडतं, नैसर्गिकपणे घडतं. ते तसेच घडायला हवं, समज भाषेतून व्यक्त होऊ लागते. ती ही आपोआपच. मूल बोलायला लागतं, ते ही सहजतेने. या सहजतेत शाळेनेही सहभाग द्यायला हवा. कारण भाषा शिकायला कोणत्याच मुलाला शिक्षण व्यवस्थेची गरज नसते.उलट एका समृध्द वातावरणाची गरज असते. म्हणजे घरातल्या माणसांचे बोलणं मुलांस. मोर घडायला हवं.तसं शाळेतही सहजपणे घडायला हवं. जितकं बोलणं समृध्द होईल, समृध्द घडत जाईल तेवढं ‘समज’ व्यक्त करणं सोपं होतं. मग इतरांचा सहभाग सुरु होतो तो आस्वादक म्हणून, कौतुक करण्यातून, प्रोत्साहन देण्यातून, आपण ऐकतोय हे जाणवून देण्यातून. आज हे कमी होत चाललंय.घरातली सहजता पाहिल्यावर येणं गरजेचं आहे. जसं घर तशी भाषा, जेवढी मुलं तेवढी घरं. जेवढी घर तेवढया भाषा. एवढयांना सामावून घेणारं बोलणं असेल तर मजा येते. खूप खूप बोलण्याची संधी मिळत रहाणं हे घडायला हवं.

असं शिक्षण व्यवस्थेत येत नाही आपण त्याला त्या व्यवस्थेचा एक भाग होण्यासाठी खेचायला लागतो. आई कुठे तरी निघालेली असते, मुलाला जायचं नसतं. मग लढाई सुरु होते. आई चिडते, ओरडते. शेवटी तिलाही वेळ नसतो. फरफटत नेऊ लागते. मनात नसताना जावं लागतं. नेमकं असंच ‘शाळा’ करते. हेच थोडा वेळ देऊन आईनं/कोणीही मोठया माणसानं जाण्याच्या ठिकाणाबद्दल एक माहोल तयार केला, गप्पा मारल्या तर एक उत्सुकता निर्माण होईल. ही

उत्सुकता न घडता उद्यापासून एका व्यवस्थेत जायचंय. Thats it असं घडतंच.

मूल असं इथे काय आहे, मजा आहे, गंमत आहे असं वाटून या व्यवस्थेत आलं की व्यवस्था बदलते. वेगळया शाळा असं करतात हे मी पाहिलं आहे. आपण हा विचार करतो का? मूल या एका नव्या व्यवस्थेत पहिल्यांदा हा येतंय? आपण मनाने काही करतो का? कुणी सांगितलं नावाच्या पट्टया बनवा, आपण बनवतो. कुणी सांगतं मुकूट घाला,आपण घालतो. कुणी सांगतं रांगोळया काढा. मनाने विचार करुन आपण काय करतो? एकदम लिहायला सुरुवात होते. एकदम वाचायला सुरुवात होते. त्यांच्या बोलण्याला लिहिण्याचे रुप मिळते का? त्याने घरी ऐकलेलं, बोललेलं फळयावर लिहिलं तर मजां येईल. नवे अनुभव मुलांना नव्या रचनेकडे घेऊन जातील.

इथे आपण पाठयपुस्तकाबरोबर वेगळी पुस्तके, शैक्षणिक वातावरण, साधनसामुग्री बनवूया. अनेक संस्था असा प्रयत्न करतांना दिसतात. अशीच एक संस्था मी राजस्थानमध्ये पाहिली. त्यांची स्वत:ची पुस्तके आहे. ती तयार करण्या मागे त्यांची विचार दृष्टी आहे. शाळेतील सगळया समूहाने मिळून ती तयार केली आहेत. गोष्टीची पुस्तके (१३ भाग), अपनी पोथी(४ भाग), मातृभाषा पुस्तक(४ भाग) अशी पुस्तके तयार करणाऱ्या संस्थेचे नाव आहे.'दिगंतर' ही संस्था गेली २०-२५ वर्षे भाषेवर वेगळे काम करत आहे. जयपूर स्थित ही संस्था पाठपुस्तक (म्हणूया) ४ या भागात काम करताना कोणता दृष्टीकोन ठेवते?१) त्यांना वाटतं अक्षरे आधी नाहीत. भाषा वाचणे लिहिणे ही प्रक्रिया चार स्तरांवर होते. संदर्भ, वाक्य, शब्द आणि त्यातील अक्षर. पण हे चार स्तर एकत्र असले पाहिजेत. याची सुरुवात संदर्भ (एकमेकांशी असणाऱ्या) वाक्यांनी झाली पाहिजे. ज्यातून अर्थ गुंफत जातो. संदर्भातून वाक्य, वाक्यातून शब्द, शब्दातून वर्ण अशी होत जायला हवी. आपोआप वर्ण-शब्द-वाक्य-संदर्भ असं घडू लागतं, कधी आपण नेमकं उलट करतो. २) शिकताना घाबरण्या ऐवजी मुलं या सगळया समृध्दीच्या प्रवासात आत्मनिर्भर होतील. स्वत: शिकणं हे घडेल. त्यामुळे रंग, वेगवेगळे उपाय यापेक्षा स्वनिर्भरता आणि सफलतेतून मिळणारी प्रेरणा यावर भर दिलां तर महत्वाचं आहे असं ही संस्था मानते. ३) मुलं समूहाचा आनंद घेतीलच पण अनेक सामाजिक मूल्यं आत्मसात करतील. म्हणूनच या शाळेत एक शिक्षक व सर्व मुलं असे गट दिसत नाहीत तर समूह दिसतो. ४) पुस्तकात जेव्हा प्रश्न असे असतात ज्याची उत्तरं त्या धडयातच असतात. तेव्हा वेगळं काही मुलं शोधत नाहीत. दिंगतरची पुस्तकं मुलांना उत्तरासाठी शोध घ्यायला लावतात. कल्पना करण्याची संधी देतात. ५) पूर्वी शिकलेलं त्या त्या इयत्तेत सोडून दिलं जातं. दिगंतर मात्र सर्व शिकण्याचे एकत्रीकरण करते. जुने सोडून न देता नवीन शिकण्यासाठी वारंवार उपयोग केला जातो. म्हणूनच अगदी सरळपणे नवे शिकायला पुढे सरकतात. म्हणून एक अखंड गोष्ट चारभागात विभागली असून ते संदर्भ घेत मुलं वाक्य, वाक्यातून शब्द आणि शब्दातून वर्ण वाचतात लिहायला लागतात. अक्षरांचा मोठा आकार, जवळ जवळ प्रत्येक पानावर चित्र असल्याने मुलांना आनंद होत असावा.

हे एका वेगळया शाळेचे उदाहरण अशासाठी आपल्या विचाराला प्रेरणा मिळते. मातृभाषेला अधिक महत्व द्यायला हवं. त्यासाठी आपल्या पातळीवर आपले प्रयोग व्हायला हवेत. सगळ्याचा अंतीम हेतू आहे मुलांना अनुभव घेता यायला हवेत, समज वाढायला हवी, समज भाषेच्या रुपात व्यक्त करता यायला हवी. पुन्हा कधी तरी पुढील भागात भेट घेऊ. पाठ कसा करता येईल ते उदाहरणातून बघू.

संपर्क क्रं:९३५६८०५४६१
(visit - loksadhana.org)

# जबाबदार पालकत्त्व

“ आपल्या कुटुंबामध्ये असणारे आई वडील किंवा वडीलधारी मंडळी यांच्याशी सौहार्दाचे संबंध ठेवले पाहिजेत. एवढेच नव्हे तर आपले नातेवाईक, शेजारी सहकारी यांचेशी ही स्नेहाचे संबंध ठेवले पाहिजेत. कारण ही मंडळी आपल्या कौटुंबिक अडचणीला मदतीला धावून येणे अपेक्षित असते. बरेच वेळा असे दिसते की, आपण आपल्या करिअरच्या मागे धावतो व या विविध घटकांकडे दुर्लक्ष करतो. आणि मग आपल्या अडचणीच्या वेळी त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा करतो व ही मदत मिळाली नाही तर आपली चिडचिड होते व आपले कौटुंबिक स्वास्थ्य बिघडते. ”



डॉ.ह.ना.जगताप
सोलापूर

दोघांनी आपल्या या मुलांच्या विकासाकडे अधिक लक्ष देणे आवश्यक असते. अलीकडे कुटुंबातील मुलांची संख्या मर्यादित असल्याने मुलांचे अधिक लाड केले जातात असे दिसून येते. मुलांना प्रेम मिळणे आवश्यक असले तरी त्यांचा अति लाड होणे हे योग्य नाही. काहीवेळा पालकांना असे वाटते की, आपल्या लहानपणी आपणास या गोष्टी मिळाल्या नाहीत. त्या आपल्या पाल्याला मिळाव्यात त्यामुळे पालक आपल्या पाल्याच्या प्रत्येक मागणी चा पाठपुरावा करू लागतात. यामुळे होते काय तर ही मुले अति लाडाने हट्टी बनतात त्यांच्या आपल्या पालकाकडून च्या अपेक्षा सातत्याने वाढत जातात आणि या अपेक्षा पूर्ण करण्याचा अट्टाहास पालकही अति प्रेमापोटी करीत राहतात. त्यामुळे या मुलांना प्रत्येक गोष्ट सहज मिळत असल्यामुळे त्याची किंमत कळत नाही त्यांना असे वाटू लागते की की प्रत्येक गोष्ट मला मिळणे हा माझा हक्कच आहे. पुढे जाऊन ही मुले ज्यावेळी समाजात मिसळतात त्यावेळी त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे प्रत्येक वस्तू किंवा गोष्ट मिळेलच असे सांगता येत नाही आणि मग त्यांच्यामध्ये एक प्रकारचे नैराश्य येते. पालकांकडून आणखी एक होणारी चूक म्हणजे आपल्या आशा-आकांक्षा व महत्त्वाकांक्षा आपल्या मुलांच्यावर लादणे होय. आपल्या मुलाच्या क्षमता, त्याची आवड, त्याचा कल व आपली आर्थिक परिस्थिती हे लक्षात न घेता आपले मूल इंजिनिअर किंवा डॉक्टर झाले पाहिजे असे प्रत्येक पालकाला वाटते. त्याच वेळी आपल्या शेजारी-पाजारी असणारी मुले एखाद्या क्षेत्रात प्राविण्य मिळवत असतील तर आपल्या मुलांनी देखील तसे प्राविण्य मिळवले पाहिजे असे वाटत राहते. आणि मग आपल्या मुलाची इतर मुलांशी तुलना करून त्याला विकृत स्पर्धेमध्ये सहभागी होण्यास भाग पाडले जाते. जर त्या मुलाची क्षमता नसेल व ते मूल विवक्षित पातळीपर्यंत पोचू शकत नसेल तर त्या मुलांमध्ये कमालीचे नैराश्य येते येते. आणि ज्या नैराश्याचा परिणाम केवळ त्या मुलावरच नव्हे तर संपूर्ण कुटुंबावर



स्पर्धेतून काही वस्तूंची खरेदी केली जाते. हे करत असताना आपली आर्थिक क्षमता लक्षात न घेता अशी खरेदी केली तर त्याचा ताण संपूर्ण कुटुंबावर येतो व परिणा मीं कुटुंबातील स्वास्थ्य हरवते. पैसा मिळवणे हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच तो योग्य प्राधान्यक्रमाने खर्च करता येणे पैशांची बचत करता येणे व पैसा वाढवता येणे याहीही गोष्टी महत्त्वाच्या असतात. यासाठीदेखील काहीवेळा आर्थिक सल्लागाराचा सल्ला घेणे हिताचे ठरते.

होतो. पालकांनी आपल्या पाल्यांना शर्यतीचे घोडे बनवू नये.

आपल्या कुटुंबामध्ये असणारे आई वडील किंवा वडीलधारी मंडळी यांच्याशी सौहार्दाचे संबंध ठेवले पाहिजेत. एवढेच नव्हे तर आपले नातेवाईक, शेजारी सहकारी यांचेशी ही स्नेहाचे संबंध ठेवले पाहिजेत. कारण ही मंडळी आपल्या कौटुंबिक अडचणीला मदतीला धावून येणे अपेक्षित असते. बरेच वेळा असे दिसते की, आपण आपल्या करिअरच्या मागे धावतो व या विविध घटकांकडे दुर्लक्ष करतो. आणि मग आपल्या अडचणीच्या वेळी त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा करतो व ही मदत मिळाली नाही तर आपली चिडचिड होते व आपले कौटुंबिक स्वास्थ्य बिघडते. कुटुंबाचे स्वास्थ्य बिघडू द्यायचे नसेल तर आणखी एका गोष्टीकडे प्रकर्षाने लक्ष देणे आवश्यक असते. हा घटक म्हणजे अर्थसाक्षरता व खरेदीचा प्राधान्यक्रम. आपले आर्थिक उत्पन्न किती आपल्यावर कोणकोणत्या जबाबदाऱ्या आहेत, आपल्या गरजेच्या वस्तू कोणत्या त्यांचा प्राधान्यक्रम कोणता? असला पाहिजे याचा विचार कुटुंबातील प्रत्येकाने केला पाहिजे. काहीवेळा केवळ खोट्या प्रतिष्ठेसाठी, इतरांच्या

(डॉ. ह. ना. जगताप हे सदस्य सल्लागार, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, माजी प्राचार्य (दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन) माजी अधिष्ठाता (पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठात कार्यरत.)

संपर्क: ९८२२६१५४६४

## संस्कृत सुभाषित...

डॉ.अनिल दिक्षित
९८२५२७२७३८

मौनं कालविलम्बश्च प्रयाणं भूमिदर्शनम् ।
भ्रुकुट्यन्यमुखी वार्ता नकारः षड्विधः स्मृतः ।।

**अर्थ – काही न बोलणे,बोलण्यास वेळ लावणे, निघून जाणे,जमीनीकडे पहात राहणे,कपाळाला आठ्या घालणे आणि तिसऱ्याशीच बोलत राहणे हे नकार देण्याच्या सहा प्रकार आहेत .**

**मराठी सुभाषित – असंबद्ध बोलणे,मौन वा विलंब अथवा प्रयाणही भाळी आठ्या जमीन बघणे तऱ्हा नकाराच्या ह्याही**

समजूनही ना समज !

# कुणी सांगाल? एक न सुटलेले गणित

> “खरा प्रश्न शिक्षणाचे खाजगीकरण झाल्या पासून, त्याला आलेल्या बाजारू व्यवस्थेशी संबंधित आहे. सध्याचे शेतकरी आंदोलन हे शेत मालाच्या बाजाराशीच निगडित आहे असे म्हणतात. पण आपल्या देशात शेती इतके शिक्षणाला प्राधान्य नाही. किंबहुना शिक्षणही राज्य, केंद्र सरकारासाठी, सर्वच पक्षासाठी लास्ट प्रयोरिटी आहे. त्यामुळे या फी वाढी विरोधात कुणी आंदोलन उपोषण करणार नाही हे त्या संस्था चालकांना, व्यापाऱ्याना माहिती झाले आहे. तुम्ही तुमच्या मुलाला शाळेतून काढले तरी त्यांच्या कडेवेटिंग लिस्ट तयार आहे. गरज तुमची आहे, त्यांची नाही.”



डॉ.विजय पांढरीपांडे
हैद्राबाद

प्रारंभीच सांगून टाकलेले बरे. मी अर्थतज्ञ नाही.गेले काही दिवस अच्युत गोडबोले यांचे अर्थात पुस्तक वाचून ज्ञानात थोडी भरपडली एवढेच. पण त्यातली बरीच गुंतागुंत मला समजली नाही हेही तितके खरे. इंजिनिअरिंगचा विद्यार्थी, अन प्राध्यापक असल्याने माझे गणित तसे बरे आहे. तरीही एक गणित मला सुटलेले नाही. त्याविषयीच लिहायचे आहे. कुणी तज्ञाने हे गणित आयुष्याच्या संध्याकाळी समजावून दिले तर समजून घ्यायचे आहे.त्यासाठी हा लेखन प्रपंच.

सध्या माझी नातवंडे प्रायमरी, प्रीप्रायमरी (युकेजी) शिक्षण घेताहेत. ती इंटरनॅशनल स्कुलमध्ये शिकताहेत. ही शी संलग्न हायफाय शाळा. डुली युकेजी ची फी दोन लाख रुपये वर्षाला. चौथीत शिकणाऱ्या नातीची फी तीन लाख! यात ब्रदर कन्सेशन आले. करोनाकाळातही यात कपात झाली नाही. उलट दरवर्षी १० टक्के वाढ या सूत्राने ती वाढली आहे.

मला न समजलेले गणित या तथाकथित आंतरराष्ट्रीय शाळांच्या अवाढव्य फीसंदर्भात आहे. वर्गानुसार ही फी दरवर्षी कोणत्या तरी अज्ञात सूत्राने वाढत जाणार आहे.

मी इंजिनिअरिंग कॉलेजचा प्राध्यापक, डीन वगैरे राहून चुकल्याने मला त्या क्षेत्रातील सरकारी, खाजगी कॉलेजच्या फी ची कल्पना आहे. ती फी एवढी भरम साठ नसते. मी सध्याच्या तुलनेत सांगतोय, उगाच आमच्या वेळी वगैरे भाषा बोलण्यात अर्थ नाही. खाजगी कॉलेजची फी एक सरकारी कमिटी ठरवते. ती फी सुद्धा लाखाच्या घरात असते. म्हणजे प्रायमरीच्या फी पेक्षा कमीच. वास्तविक इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राध्यापकांचे पगार महिन्याला लाखाच्या घरात. सातव्या आयोगाने ते कितीतरी वाढले. शिवाय प्रयोगशाळा, कॉम्प्युटर, सॉफ्टवेअर, प्लेसमेंट, क्रीडांगण, हे खर्च वेगळे! शिवाय आरक्षण, म्हणजे ती फी उशीराने सरकार देणार. हेच तत्व मेडिकल शिक्षणालाही लागू. फी अर्थात जास्त. पण तरीही खाजगी शाळांची फी जास्तच वाटते. प्रायमरी

शाळेच्या शिक्षकांना (बहुतांश शिक्षिका), एवढे पगार नसतात. ती खातरजमा मी करून घेतली. त्यांचे शाळेचे आवार, कॅम्पस, मोठे असते. पण ही काळा पैसा पांढरा करण्यासाठी केलेली क्लुप्ती ! स्वच्छता, नीटनेटकेपणा कौतुका स्पद. पण तरीही एवढी अवाढव्य फी कशासाठी या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

या शाळांवर सरकारी नियंत्रण नाही का? त्यांना जाब विचारणारे कुणी नाही का? त्यांच्या हिशेबाचे ऑडिट होत नाही का? कागदोपत्री या प्रश्नाची उत्तरे होकारार्थी आहेत. पण फक्त कागदोपत्रीच. म्हणजे सरकारी कपाटात धूळखात पडलेल्या फायली पुरतीच. प्रत्यक्षात अशा इंटरनॅशनल शाळांवर कुणाचा वचक नाही. कुणीही त्यांना जाब विचारणारे नाही. काही पालकांनी एकत्र येऊन क्षीण आवाजात जाब विचारण्याचा प्रयत्न केलाही असेल पण त्यांना कुणी दाद देत नाही. वर्तमान पत्रात बातम्या येतात.चर्चा होतात.त्या हवेत विरून जातात. तुम्हाला फी परवडत नसेल तर घेऊन जा,असे या पालकांना बजावण्यात येते.

आमच्या तेलंगणा राज्यात या फी वाढी संदर्भात एका माजी कुलगुरूच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. त्यांनी सकारात्मक रिपोर्ट लिहून दिला. मला या फी प्रकरणात इंटरेस्ट असल्याने मी त्यांच्याशी चर्चा ही केली. पण तेही हतबल झाल्या सारखे बोलले. म्हणजे समित्या बसतात. त्यांचे चहापाणी, भत्ते, मानधन या वर लाखो रुपय खर्च होतात. पण त्यातून सकारात्मक असे काही निष्पन्न होत नाही. या शाळेच्या व्यवस्थापना चे सरकार दरबारी लागे बांधे असतात. ते आपल्याला हवेते, हवे तसे मॅनेज करून घेतात. सुटकेसच्या घेवी देवी होतात. हे समिती बसवणे म्हणजे सरकारचा टाईम पास असतो. जसे आता विद्यापीठ कायदा सुधारण्यासाठी समिती बसली आहे. त्यातून सुधारणार काहीच नाही. समस्या तशाच राहतील. कारण मुळात सरकारला समस्या सोडवायच्याच नसतात. याच तेलंगणा राज्यात गेले एक वर्षांहून अधिक काळ एकूण आठ दहा विद्यापीठात नियमित कुलगुरूच नाहीत. सरकारी अधिकारी अूर्वेळ इंचार्ज म्हणून काम पाहता हेत. उच्च शिक्षणा बद्दल सरकारची ही आस्था असेल तर प्रायमरी शाळेची फी हा अगदीच फालतू विषय! विद्यापीठाला नियमित कुलगुरूची गरज नसते, उलट नियमित कुलगुरू असतात तेव्हाच समस्यां निर्माण होतात, हे नवे प्रमेय, हायपोथीसिस आता सिद्ध होतेय की काय याची भीती वाटते!

या शालेय शिक्षण संस्थाच्या संबंधित, व्यवस्थापनातील काही ओळखीच्या मंडळींशी चर्चा करण्याचा मी प्रयत्न केला. या भरमसाठ फी मागची तात्विक आर्थिक बाजू समजून घेण्याचा प्रयत्न केला. पण यश आले नाही. या व्यवसायात शंभर टक्के पेक्षाही जास्त नफा आहे एव्हढे मात्र समजले. पण हा शंभर टक्के नफा कायदेशीर आहे का ? तो मिळविण्याचा, म्हणजे पालकांना लुटण्याचा नैतिक अधिकार या शाळा व्यवस्थापनाला आहे का, यांच्या वर इन्कम टॅक्सची नेर नसते का, यांच्या मागे ईडी नसते का, या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. दिल्ली सारख्या शहरात केजरीवाल सरकारने शाळांत बऱ्याच सुधारणा केल्या असे कळते. पण प्रायव्हेट शाळांच्या फी बाबतीत तेथेही तोच प्रकार आहे असे कळते. काही राज्यात अशा श्रीमंत व्यावसायिक शाळा चालकांना शिक्षण सम्राट असे गोंडसनाव आहे. आधी साखर सम्राट, नंतर शिक्षणसम्राट, पाठोपाठ आमदार, खासदार, मग मंत्री असा हा तीर्थयात्रेचा गोंडस, सामाजिक दृष्टीने पावन प्रवास!

पालकांशी चर्चा करून पाहिली. एक पालक

घरचीच. माझीच मुलगी! त्यांचे एकच ब्रीद वाक्य: TIN-, There is no alternative. दुसरा पर्यायनाही! यानव्या पिढीशी वाद घालतांना एकच तत्व पाळावे लागते. युआरओके. आयएमआल्सो ओके. कारण दोन ध्रुवावर दोघे आपण, अशी वस्तुस्थिती असते.

सरकारी शाळांची संख्या, तेथील सुमार सोयी, सुविधा, शिक्षकांचा एकूण या विषयी बरेच सांख्यिकी अहवाल उपलब्ध आहेत. खेड्यापाड्यातल्या काही निवडक उत्कृष्ट शाळा, त्यांचे छान उपक्रम याबातम्याही अधूनमधून प्रसिद्ध होतात .पण ते अपवाद. कभी खुशी कभी गमया गाण्यासारखे. आशावादी किरण, कवडसे फार कमी. अंधारच जास्त, हे कटू सत्य नाकारता येत नाही.

या इंटरनॅशनल शाळेतला खर्च फक्त फी पुरता मर्यादित नाही. शाळेचा गणवेश, शाळेतूनच खरेदी करावयाची वह्या पुस्तके, शाळेची बस फी, न्याहारी, जेवण, मुलांनी करावयाचे प्रोजेक्ट्स (मुलांनी म्हणजे पालकांनी), वेगवेगळ्या स्पर्धा, त्यासाठी लागणारे स्पेशल ड्रेसेस, हा खर्च अर्थातच वेगळा. अधूनमधून ही विद्यार्थी समाज कार्य करायचे मानून वर्गणी सुद्धा गोळा करतात. तो भुर्दंड वेगळा. हा सगळा खर्च, आनंदाने नव्हे पण मजबुरीने करणाऱ्या पालकांचे या मागचे तत्वज्ञान एवढेच:

आम्ही दोघे ही कमावतो .कशासाठी, कुणासाठी, मुलांसाठीच ना? जे आम्हाला मिळाले नाही ते आमच्या मुलांना मिळायला हवे.त्यांना कुठे काही कमी पडायला नको!

हे उत्तर ऐकून मी मनातल्या मनात विचार करतो, यांना तरी कुठे काय कमी पडले? जर कमी पडले असते तर एवढी कमाई करण्याची योग्यता त्यांच्यात कुठून आली? त्यांचे सोडा, त्यांच्या आधीच्या, म्हणजे आमच्या पिढीला तरी कुठे के काय कमी पडले.? नगरपालिकेच्या शाळेत मराठी माध्यमातून शिकूनही आमचे कुठे काय नुकसान झाले? हे त्यांना कसे समजवायचे, त्यांच्या गळी कसे उतरवायचे हाही प्रश्नच आहे न सुटलेला !

हा प्रश्न, हे गणित एहा विशिष्ट, अल्पसंख्याक समाज वर्गाशीच संबंधित आहे हे खरे. ज्यांच्या जवळ भरपूर पैसा आहे, नवरा बायको दोघेही कमावते आहेत, जे शहरात राहता हेत, अशा सुशिक्षित, सधन वर्गाशी हे संबंधित आहे. पण आजकाल अशा इंटरनेशनल शाळा तालुक्याच्या परिसरात पोहोचल्या आहेत. कुठेही मोठ्या प्रांगणात दहा बारा स्कुल बसेस दिसल्या की समजावे, ही भरमसाठ फी आकारणारी शाळा. अशा शाळांना कॉन्व्हेंटही म्हणतात !

खरा प्रश्न शिक्षणाचे खाजगीकरण झाल्या पासून, त्याला आलेल्या बाजारू व्यवस्थेशी संबंधित आहे. सध्याचे शेतकरी आंदोलन हे शेत मालाच्या बाजाराशीच निगडित आहे असे म्हणतात. पण आपल्या देशात शेती इतके शिक्षणाला प्राधान्य नाही. किंबहुना शिक्षणही राज्य, केंद्र सरकारासाठी, सर्वच पक्षासाठी लास्ट प्रयोरिटी आहे. त्यामुळे या फी वाढी विरोधात कुणी आंदोलन उपोषण करणार नाही हे त्या संस्था चालकांना, व्यापाऱ्याना माहिती झाले आहे. तुम्ही तुमच्या मुलाला शाळेतून काढले तरी त्यांच्या कडेवेटिंग लिस्ट तयार आहे. गरज तुमची आहे, त्यांची नाही. एकूण काय मूळ प्रश्न आहे तसाच राहणार. कवी अनिल यांच्या कवितेत एका अक्षराचा बदल करून मी एवढेच विचारेन: कुणी याला सांगाल का? या अवाढव्य शालेय फी चे गणित समजवाल का?

संपर्क:७६५९०८४५५५.

# सुचले म्हणून



**अंजली देशपांडे**
ठाणे

> “ वरील सर्व process मध्ये शिकवणे व त्याही पेक्षा मुलांकडून शिकण्यात खूप आनंद मिळाला. शाळा जरी मिशनरी असली तरी आमला मॅडमने कधीही संस्कृत संबंधित उपक्रम राबवायला हरकत घेतली नाही. संपूर्ण संस्कृत चा वर्ग श्री गणपती स्त्रोत्राने सुरू व्हायचा. नशिबाने मुलं पण गुणी होती अगदी दणक्यात संस्कृत दिन साजरा करायची. ”

शिक्षकांनो लिहते व्हा ! असे मासिक शिक्षणयात्रीचे आवाहन वाचनात आले आणि आपल्या शिक्षकपदाची कारकिर्द डोळ्यासमोरून तरळून गेली. आपण सुसंगत लिहता येत नसले तरी आपण लिहू शकतो हा आत्मविश्वास मनात होताच. म्हणून लिहायच नसते.

जून २००६ मध्ये शाळेत शिकवायला सुरुवात केली.पहिल्या वर्षी फक्त एकच म्हणजे इयत्ता आठवीचा संपूर्ण संस्कृत वर्ग दिला होता. तेव्हा माझे एम.एस.चे दुसरे वर्षे सुरु होते.

दुसऱ्या वर्षी पासून मात्र संपूर्ण जबाबदारी अंगावर पडली, म्हणजे इयत्ता आठवी, नववी, दहावी वर्गाचे संपूर्ण व संयुक्त संस्कृत. मला सर्व अनुभव खुप नविन आनंददायी होते. कारण वयाच्या ४३ व्या वर्षी शिक्षक म्हणून नोकरीस सुरूवात केलेली. पण मी खुप एन्जॉय करत होते. माझे पहिले दोन वर्षे तर सर्व समजून घेण्यातच गेली, लॉग बुक,प्लॅन बुक,इ.एक सांगायचं राहिले मी रेग्युलर जॉईन केल्यावर म्हणजे २००७-२००८ च्या तुकडीतील दोन विद्यार्थिनींना संयुक्त संस्कृत मध्ये पैकीच्या पैकी गुण मिळाले.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आमला स्टॅनली यांनी मी बी.एड.करावे म्हणून आग्रह धरला. मग त्यांच्याच प्रोहत्सानामुळे व सहकार्यामुळे मी बी.एड.प्रशिक्षण पूर्ण केले.

बी.एड.करतांना संपूर्ण वर्गात मी senior citizan होते. त्यामुळे काही फरक पडला नाही. कारण मी माझ्या सर्व वर्ग मित्र-मैत्रिणींमध्ये खुप एकरुप झाले होते, व त्यांनीपण माझ्या मोठ्या वयाचा कुठेही गैरफायदा घेतला नाही.अगदी व्यवस्थित पण मर्यादा सांभाळून माझी फिरकी घेतली जायची. कुठेही सवलत नव्हती व समवयस्क असल्यासारखी पण आदरयुक्त वागणूक मिळायची पण ह्या सर्वांमुळे मी कमीत कमी-४-५ वर्षे तरुण झाले.सर्व उपक्रमात १५ ऑगस्ट २६, जानेवारी, स्नेह संमेलनात सहभाग घेतला.

सर्वात मजेशीर भाग तर असा आहे कि, माझ्या १५ वर्षाच्या कारकीर्दीत अगदी २००७ ते २०१९

ऑक्टोबर पर्यंत अगदी दरवर्षी न चुकता प्रशिक्षण घेतले. म्हणजे कधी इयत्ता आठवीचे पुस्तक बदलले तर कधी नववीचे तर कधी दहावीचे. तर कधी पेपर पॅटर्न बदलला .

वरील सर्व process मध्ये शिकवणे व त्याही पेक्षा मुलांकडून शिकण्यात खूप आनंद मिळाला. शाळा जरी मिशनरी असली तरी आमला मॅडमने कधीही संस्कृत संबंधित उपक्रम राबवायला हरकत घेतली नाही. संपूर्ण संस्कृत चा वर्ग श्री गणपती स्त्रोत्राने सुरू व्हायचा. नशिबाने मुलं पण गुणी होती अगदी दणक्यात संस्कृत दिन साजरा करायची.महत्वाचे म्हणजे जेव्हा तोंडी परीक्षा सुरु झाल्या तेव्हा आम्ही संभाषण कौशल्याच्या वेळेस आमला मॅडम हजर राहून मुलांनी सादर केलेले छोटे संवाद (संस्कृतमध्ये) ऐकायच्या. आनंद घ्यायच्या.आणि म्हणायच्या की i can understand only ....

२०१३ डिसेंबर महिन्यात पार पडलेल्या स्वामी विवेकानंद जयंती स्पर्धेमध्ये श्रुती कुलकर्णी ह्या विद्यार्थिनीला संपूर्ण मुंबई मध्ये प्रथम क्रमांक मिळाला. खूप अभिमान वाटला. जे सरळ सोप आयुष्य होत ते या कोव्हिड -१९ ने पूर्णपणे बदलून टाकले. नवीन तंत्रज्ञानाशी मैत्री करावी लागली व आत्ता पर्यंत जे शब्द फक्त कानावर पडले होते cut-paste, copy-paste, download, send etc. आपल्या तोंडात रुळले. अर्थात हे खूप समाधान देणारे आहे.

**संपर्क : ९९८७०८००८९**

**(अंजली नितीन देशपांडे या लिटील फ्लॉवर हायस्कूल ठाणे येथे कार्यरत)**

---

www.shikshanyatri.com

## जागतिक पटलावर 'शिक्षणयात्री'...



*होय, शिक्षणयात्री मासिक अल्पावधीत शिक्षण क्षेत्रातील अनुभूतींचं हक्काचं व्यासपीठ झालंय. शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील विचारांना, उपक्रमांना सर्वदूर पोहचवण्यात 'शिक्षणयात्री' ला यश मिळालेय.*

*तरीही 'ऑनलाईन' काळ पहाता 'शिक्षणयात्री' मासिकाने आपला आवाका वाढवण्याचं ठरवलंय. संकेत स्थळाच्या माध्यमातून जागतिक पटलावर. 'शिक्षणयात्री' दिसणार आहे. कधीही कुठेही... संगणकावर.. मोबाईलवर शिक्षणयात्री अंकाविषयी जाणून घेता येणार आहे. नव्या वर्षात...नव्या दमाचं शिक्षणयात्री पहायला आपल्याला नक्कीच आवडेल... www.shikshanyatri.com या संकेतस्थळाला भेट देवून आपला अभिप्राय अवश्य नोंदवा.*

*-संपादक*

# सुवर्ण महोत्सव ज्ञानमाऊलीचा


पारडी (ता.सेलू) : जिल्हा परिषदेच्या सुवर्ण जयंती महोत्सव व माजी विद्यार्थी मेळाव्यात मार्गदर्शन करताना जिल्हा परिषदेचे सदस्य राजेंद्र लहाने व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

## माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला लाखाची मदत

### पारडी जिल्हा परिषद शाळेचा सुवर्ण महोत्सव

सेलू, ता. २० (बातमीदार) : पारडी (ता. सेलू) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला ५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त बुधवारी (ता. १९) सुवर्ण महोत्सव पार पडला. यानिमित्ताने माजी विद्यार्थ्यांचा मेळावा घेण्यात आला. यामध्ये माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी एक लाख रुपये देण्याची घोषणा केली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उज्वला

**केंद्रीय सचिवांचा व्हिडिओ कॉलद्वारा ऑनलाइन**

या कार्यक्रमास खास दिल्लीवरून केंद्रीय सचिव डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या मेळाव्यात व्हिडीओ कॉलद्वारा ऑनलाइन मार्गदर्शन केले. ते म्हणाले, मीसुद्धा जिल्हा परिषद शाळेतच शिकलो. जिल्हा परिषद शाळा ही 'आई'प्रमाणे असते. तिच्या प्रती सतत प्रामाणिक रहा. त्यांनी गावकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. या ऑनलाइन शुभेच्छांनी सर्व गावकरी व माजी विद्यार्थी भारावून गेले.

**विद्यार्थिनींना पुरस्काराने सन्मानित**



**युवराज माने**

सेलू, परभणी

कुतूहलाच्या पाऊलवाटेवर उत्तरं हाती येऊ लागतात. रामनगर, विजयनगर, आडेतांडा व गावातील चौकाचौकात आमच्या चिमुकल्यांचा रात्र अभ्यासिकेचा गट भरू लागला.भूतो ना भविष्यती रात्रीच्या वेळी पुस्तकातील कवी, कथाकार, लेखक मुलांसह बाया-पोरांसोबत संवाद साधू लागले. आपल्या काव्यातून शेतकऱ्याची कथा,व्यथा व महानता मांडणारे इंद्रजीत भालेराव,कौटुंबिक प्रेमाचा धागा आपल्या कथेतून सुंदर गुंफणारे रा रं बोराडे, एकनाथ आव्हाड, त्याचप्रमाणे बालभारतीच्या पुस्तकातील अनेक कवी,लेखक अशी कितीतरी शब्दप्रभू रोज हजेरी लावू लागले.मुलांच्या आई-वडील,आजी-आजोबांचा बालपणातील शिक्षणाचा काळ फार हलाखीत गेलेला पण आज तो परत या लेकरांच्या माध्यमातून काहीसा अनुभवता तरी येत आहे याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर जाणवू लागलं.दिवसभर शेतात कष्ट करून शीणलेलं शरीर मुलांच्या अभ्यासगटात लहान मुलांप्रमाणे रमू लागले कष्टकरी ऊसतोड कामगारांच्या तांड्यावर आता दररोज ज्ञानसोहळा सुरू झाला.चिमुकल्या उपक्रमांच्या तरलतेतून केवढं मोठं विश्व साकारता येतं याचा प्रत्यय येऊ लागला.

आपण शिक्षक म्हणून प्रयत्नांचे मोहोळ उठवण्यात कमी पडत आहोत असं नेहमी वाटायचं. दिवसभर शाळेत मुलांना रमवून ठेवण्यासाठी आम्ही शिक्षक प्रयत्न करू लागलो. रात्र अभ्यासिकेच्या माध्यमातून पालकांना शिक्षणाचं महत्व समजावण्यासाठीचा आमचा अट्टाहास थोडाफार यशस्वी होऊ लागला.पण पालकांनी स्वतः होऊन शाळेत येणं,आम्हा शिक्षकांना आपल्या स्वतःच्या मुलांविषयी विचारणा करणं.याची आम्ही वाट पाहत होतो.पण हे घडत नव्हतं.वयाच्या कोवळेपणाचा उंबरठा पार करून काही मुलांची प्रतिभा थक्क करणारी भासते;जी आमच्या या शाळेतील लेकरांत अनेक प्रसंगातून सातत्यानं जाणवायची.याच प्रतिभेला शोधून योग्य दिशा देण्याचे काम आमच्यासह पालकांकडून घडावं यासाठी आम्ही शिक्षक व माऊली

राठोड प्रयत्न करत होतो.'शाळा गावात गेली पाहिजे व गाव शाळेत आलं पाहिजे' यासाठीचा विचार सतत डोक्यात घोंगावत होता. याविषयी मुलांसोबत पालकांना शाळेत आणण्यासाठी चर्चा करत असताना अचानक शाळेच्या स्थापना दिनाकाकडे लक्ष वेधले गेले आणि उत्तर सापडलं. मुलांना म्हणालो, आपण आपल्या शाळेचा वाढदिवस साजरा करूयात का? असं म्हणताचं मुलांची डोळे एकदम चमकले. काहीजण हसू लागले.गुरुजी, शाळेचा कुठं वाढदिवस साजरा करत असतात का? असं नेहा म्हणाली. मुलांचा गोंगाट सुरू झाला. काहीजण खरंच किती छान कल्पना आहे असं समजून शाळेचा वाढदिवस कसा साजरा करायचा या विचारात मग्न झाले मला मात्र खूप आनंद झाला.कारण आजपर्यंत ज्या शाळेने अनेक विद्यार्थ्यांना आपलं ज्ञानामृत पाजलं,अनुभवांची धडे देवून अनुभव संपन्न करून भविष्यातील दाहीदिशा पादाक्रांत करण्यासाठी बलवान भरून पाठवलं.त्या सर्वांना परत एकदा आपल्या या ज्ञानमाऊलीची आठवण करून देणे व त्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणं,दिलेल्या ज्ञानाविषयी उतराई होण्याची संधी उपलब्ध करून देण्याची योग्य वेळ आहे असं वाटू लागलं. याच धाग्यासोबत गावातील लोकांना शाळेशी गुंफता येईल.एक वेगळं नातं निर्माण करता येईल याविषयीच्या विचारात मी गढून गेलो.खरंतर हा आमच्यासाठीअतिशय महत्त्वपूर्ण मार्ग सापडला होता.

शाळेची पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. आपण शाळेचा सुवर्ण महोत्सव साजरा करूयात का?हा विचार माऊली राठोड व शाळेतील शिक्षकांसमोर ठेवण्यात आला.सर्वांना थोडं वेगळं वाटलं.पण ज्या लेकरांसाठी आपण धडपडत आहोत.गावातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रयत्न करत आहोत;त्यांना या सुवर्ण महोत्सव कार्यक्रमातून गावातील या ज्ञानमंदिराची महती पटवून देता येईल अशी सर्वांना आशा वाटू लागली. सर्वांनी एकमुखाने शाळेच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमास मंजुरी दिली.'डोक्यात येणाऱ्या कल्पनेला इच्छेची साथ मिळाल्यास किती सुंदर काम घडू शकतं!' हे शाळेच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमातून सर्वांना कळलं.माऊली राठोड,शाळा व्यवस्थापन समिती,ग्रामपंचायत या सर्वांना एकत्रित करून शाळेच्या सुवर्ण महोत्सवाचा ठराव मांडण्यात आला खरंतर गावकऱ्यांना याविषयी काहीच माहित नव्हतं.परंतु उपक्रमांच्या माध्यमातून लेकरांमध्ये होणारा बदल त्यांना दिसत होता.सुवर्ण महोत्सवाची तयारी करणं हे जिकरीचे काम होतं.शाळेच्या स्थापना दिनांकापासून ते आत्तापर्यंतच्या माजी विद्यार्थ्यांची नाव शोधून त्या सर्वांना आमंत्रित करणे हे मोठं आव्हानचं होतं. पण हार मानतील ते शिक्षक कसले आम्ही सर्व शिक्षकांनी स्थापना दिनांकापासूनच्या हजेऱ्या काढून त्यातील माजी विद्यार्थ्यांनी नावे लिहून काढली. माऊली राठोड व  शाळा व्यवस्थापन समितीने ठरविले की,मागील पन्नास वर्षात शाळेत शिकून गेलेल्या व आज यशस्वीरित्या वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सुवर्ण महोत्सवात जाहिर सत्कार करायचा. हेही मोठं आव्हान होतं.अशा यशस्वी झालेल्या व वेगवेगळ्या पदांवर काम करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांची यादी ही वेगळ्या पद्धतीने करण्यात आली.

आपल्या देहाला मनाचा साक्षात्कार देणारा क्षण शाळेतच हाती येतो. हे मन घडवण्याचे कार्य गावातील शाळेत अतिशय जीव लावून तेथील प्राथमिक शिक्षक करत असतात.आपल्या वात्सल्याने शाळा लेकरांना मायेनं घडवत असते.याची जाणीव व्हावी व गावातील शाळेचे महत्व आजी-माजी सर्व विद्यार्थ्यांना कळावं,गावकऱ्यांना शिक्षणाविषयी एक नवीन दृष्टी यावी,रात्रंदिवस ऊसाच्या फडात चिपाडं तोडण्यात आयुष्य खर्ची घालणाऱ्या कष्टकरी बापांना लेकरांनी शिकून आयुष्याच्या मावळत्या समयी का होईना सुखद

विसावा द्यावा यासाठी गावातील 'ज्ञानमाऊली' किती अमूल्य आहे याची जाण व्हावी म्हणून शाळेचा सुवर्ण महोत्सव जिल्हा परिषद अध्यक्ष उज्वलाताई राठोड,शिक्षण अधिकारी विठ्ठल भुसारे शिक्षण सभापती राजेंद्र काका लहाने व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात संपन्न झाला.शाळेच्या सुवर्ण महोत्सव असल्यामुळे शाळा नववधूप्रमाणे नटवली होती. विद्यार्थ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. कारण आज त्यांच्या घरचे आई-वडील सर्व शाळेत येणार होते.भूतो न भविष्यती गावातील लहान थोरासहित आजी-माजी विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा शाळा भरली होती. दोन दिवसांपासून शाळेच्या महोत्सवाची जय्यत तयारी सुरू होती. मागील पन्नास वर्षात यशस्वी होऊन वेगवेगळ्या पदावर काम करणाऱ्या २५ माजी विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा याप्रसंगी घेण्यात आला.अनेक माजी विद्यार्थ्यांनी शाळेची महती आपल्या शब्दांमध्ये गावकऱ्यांसमोर गायली.'समुद्राच्या लाटा जशा कधीच जुन्या होत नाहीत, त्याप्रमाणं या आठवणींच्या लाटा आजही नव्यानं माजी विद्यार्थ्यांच्या मनात हेलकावतांना पाहायला मिळाल्या. या आठवणींच्या लाटांमध्ये आम्ही सर्वजण न्हाऊन निघालो. शाळेचा सुवर्ण महोत्सव एका तांड्यावर साजरा होत आहे याची कल्पना  केंद्रीय सचिव डॉ. विजय सूर्यवंशी यांना दिली असता त्यांनी रात्री नऊ वाजता दिल्लीवरून थेट गावकऱ्यांशी इंटरनेटद्वारा संवाद साधला.शिक्षणावर प्रेम करणारा हा अवलिया माणूस, खेड्यापाड्यातील मुलांच्या शिक्षणाची जाणीव असणारं हे व्यक्तिमत्व गावकऱ्यांशी संवाद साधतयं आणि माजी विद्यार्थ्यांना शाळेच्या ऋणातून उतराई होण्याविषयी आव्हान करतंय ही बाब माझ्यासह माझ्या गावकऱ्यांना हृदयस्पर्शी वाटली.डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत उपस्थित यशस्वी माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या ऋणातून उतराई होण्यासाठी दरवर्षी एक लाख रुपयाचा निधी देण्याचं जाहिर केलं.हे ऐकून गावकऱ्यांचा व आमचा आनंद गगनात मावेनासा झाला.

माजी विद्यार्थ्यांच्या एकत्र येण्यातून शाळेसाठी एक निधी उभा राहिला.शाळेत शिकणाऱ्या विध्यार्थ्यांसमोर एक आदर्श उभा राहिला. यशस्वी विद्यार्थ्यांच्या जीवनाचा खरा पाया गावातील शाळेतच घातला याची जाहिर कबुली त्यांनी दिली व गावकऱ्यांच्या मनात शाळेविषयीची आस्था निर्माण झाली. या यशस्वी विद्यार्थ्यांप्रमाणेच आपली ही मुलं यशस्वी व्हायला हवीत व ती नक्कीच यशस्वी होतील असा विश्वास गावकऱ्यांना मिळाला.घर आणि शाळा एकमेकांना जोडणे सामाजिक गरज आहे.केवळ शाळेच्या भरोशावर निर्भर असलेली मुलं किती पल्ला गाठणार? पण गुरुजी व पालक यांच्या सामोपचाराने लेकरांना दिशा मात्र नक्की देता येऊ शकते.हे मात्र खरं आहे.

**(युवराज माने हे जि.प.शाळा पारडी ता.सेतू जि.परभणी येथे उपशिक्षक म्हणून कार्यरत.) संपर्क :७५१७४७८५७०**

## संस्कृत सुभाषित...

**डॉ.अनिल दिक्षित**
९८२५२७२७३८

**यो न सञ्चरते देशान् यो न सेवते पण्डितान् ।**
**तस्य संकुचिता बुद्धिर्घृतबिन्दुरिवाम्भसि ।।**

**जो देशोदेशी फिरत नाही (अभ्यासासाठी)जो विद्वानांची सेवा करत नाही,त्याची बुद्धी पाण्यावर टाकलेल्या तुपाच्या थेंबाप्रमाणे आकुंचन पावते.**

**मराठी सुभाषित –**

**करीत नाही देशाटन जो  सेवा वा विद्वानांची**
**शीतजलातील तुपासारखी**
**आक्रसते बुद्धी त्याची**

# इगा...



सुनिल मोरे
शिंदखेडा, धुळे

> स्वमग्नता आणि मतिमंदत्व यामुळे फारसे काही बोलू न शकणाऱ्या ह्या बालकाला केवळ दोनच शब्द बोलता येत होते ते म्हणजे ना आणि इगा. त्यामुळे शाळेतील सर्व मुले त्याला इगा म्हणायची आणि आम्ही पण त्याला इगा म्हणू लागलो. यश असे त्याचे नाव उच्चारले तर फारसा प्रतिसाद त्याच्याकडू मिळत नसायचा मात्र इगा बोललो तर लागलीच बघायचा.एकदा सर्व मुलांना आम्ही सांगितले की, खेळतांना याला पण सोबत घेत चला आणि तेंव्हापासून त्यांच्यात खेळताखेळता तो शाळेत खूप रमू लागला.असा होता हा इगा.!

डुंबली नाती किती ,वाहून गेल्या ओळखी
राहिले माझे तुझे नाते लव्हाळीसारखे

२३ वर्षांपूर्वी मी नोकरीची सुरुवात केली ती निसर्गसौंदर्याने नटलेल्या,रत्नांची खाण म्हटल्या जाणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्यात, निसर्गाच्या कुशीत एका छोटेखानी खेडेगावात.एका बाजूला उंचच उंच डोंगर ,तर दुसऱ्या बाजूला अथांग असा पसरलेला निळाशार समुद्र जिकडे तिकडे गर्द पसरलेली वनराई आणि पायाखाली तांबडी माती, पावसाळ्यात तर बघायला नको दोनदोन तीनतीन दिवस न थांबता सलग पडणारा मुसळधार पाऊस, तश्यातच भातशेतीत राबणारे शेतकरी असं सारं काही नवीन होतं माझ्यासाठी आणि तशीच नवीन होती ती भाषा. होती मराठीचं पण बोलण्याची ढब मात्र खूप वेगळी. गाव म्हणजे लहान लहान वाड्यांची वस्ती होती. पैकी मोठ्या वाडीवर शाळा होती. गावातील सारीच घरे कौलारू आणि सारेच ग्रामस्थ शेतकरी. अशा वातावरणात शिक्षक म्हणून नोकरीची सुरुवात केली. आणि बघता बघता १६ वर्ष सातत्याने ' कोकणची माणसं साधीभोळी, त्यांच्या हृदयात भरली शहाळी' या अनुभवासह स्वतःला तिथल्या वातावरणाशी समरस करून घेतले. आणि स्वग्रामीच्या अनिवार ओढीने २०१३ साली स्वजिल्ह्यात बदली करून आलो.

कोकणातून मायदेशी येतांना हस्तकलेच्या अविष्काराचे लेणं आणि त्यासोबत अनेक अविस्मरणीय आठवनींच गाठोडं देखील घेऊन आलो त्यापैकीच दहा वर्षांपूर्वीचा हा एक हृदयस्पर्शी प्रसंग नुकत्याच संपन्न झालेल्या जागतिक मतिमंद दिवसाच्या निमित्ताने.

२०१० ला आमच्या शाळेत एका मतिमंद मुलाने प्रवेश घेतला. यश दवंडे असे त्याचे नाव जेमतेम शिकलेल्या गरीब शेतकरी असलेल्या पालकाने आमचा बाबू ना, लई हुशार आहे याला शाळेत घ्या म्हणून मुलाला शाळेत आणलं. प्रत्येक आईवडिलांना जसा आपला मुलगा गुणाचा वाटतो तसे त्यांनाही वाटणं साहजिक होतं.त्याला बघताक्षणी कुणीही त्याला जवळ घ्यावं असा तो दिसायला गोंडस होता.मात्र या बालकास परमेश्वराने जन्माला घातले ते काही उणिवा घेऊनच.त्या मुलाचा मर्यादित बुध्यांक,

उतावीळपणा,स्मरण व विचार यांसह भाषा प्रकटीकरणात अडचण अशा प्रमुख समस्या होत्या. जिल्ह्याच्या ठिकाणी तुम्ही याला शाळेत घाला. तिथे सर्व सुविधा मिळतील आणि हा तिथे ठीक होईल म्हणून आम्ही शिक्षकांनी पालकांना सुचवले. पण यश हा आमचा एकूलता एक मुलगा आहे गुरुजी, आणि त्यातच तो असा इतरांपेक्षा वेगळा आहे म्हणून आम्ही त्याला कुठेच नाही पाठवणार.इथे शाळेत आमच्या डोळ्यांसमोर राहिल तो. म्हणून पालकांनी सांगितले.त्याचा जन्मदाखला मागवला साडेसहा वर्षे वयाची पूर्ण झाली होती आणि त्याच्या पालकांची कळकळीची विनंती म्हणून आम्ही त्याला शाळेत प्रवेश दिला.आणि तेंव्हापासून यश मिळेल ती पिशवी पाठीवर दप्तर म्हणून अडकवून शाळेत नियमित येऊ लागला.इतक्या बोलक्या चेहऱ्याचा असून देखील त्याला मतिमंदत्वामुळे फारसे बोलणे जमत नसे त्यातच त्याच्या तोंडातून सारखी लाळ गळत असे म्हणून तो इतरांपेक्षा कसा वेगळा आहे हे सर्वांना जाणवायचे.यामुळेच शाळेतील इतर मुले त्याच्याजवळ फारशी जात नसत मग तो अस्वस्थ होत असे.अशा मतिमंद बालकांमध्ये भोवतालची परिस्थिती समजण्याची असमर्थता, स्वतःची काळजी घेण्याची असमर्थता, अपुरा व्यक्तिविकास,अपुरे सामाजिक समायोजन ,मन एकाग्र करण्याचा अभाव, वर्तनसमस्या आढळून येतात.असे असले तरीही यश मला फार आवडायचा.हळूहळू त्यालाही कदाचित जाणीव होऊ लागली की हे गुरुजी मला जवळ घेतात. म्हणून वाटेल तेंव्हा यश माझ्या वर्गात येऊन बसायचा.मी शिकविताना कधी मध्येच काहीतरी बरळत असायचा तर कधी शून्यात हरवून एकटक माझ्याकडे बघत बसायचा.त्याच्या तोंडातून येणारी लाळ पुसण्यासाठी मी घरून हातरुमाल घेऊन जायचो आणि त्याला द्यायचो.स्वतः कृती करून दाखवून त्याला लाळ पूस म्हणून सांगायचो. कधी तो पुसायचा तर कधी मातृहृद्याने मीच त्याची लाळ पुसून द्यायचो.हळूहळू त्याला माझी आणि मला त्याची कशी सवय होऊन गेली ते समजलेच नाही.कधी खूप शांत तर कधी खूप चंचल असं त्याच वागणं आम्हा सर्व शिक्षकांना जणू एक आव्हान होते.कुणी अधिकारी शाळेत आले तेंव्हा आम्ही यश च्या विषयावर त्यांच्याशी चर्चा करायचो. त्याच्यासाठी विशेष शिक्षक देखील मधेमधे भेटीला यायचे परंतु तो त्यांच्याजवळ फारसा खुलत नसायचा.

स्वमग्नता आणि मतिमंदत्व यामुळे फारसे काही बोलू न शकणाऱ्या ह्या बालकाला केवळ दोनच शब्द बोलता येत होते ते म्हणजे ना आणि इगा. त्यामुळे शाळेतील सर्व मुले त्याला इगा म्हणायची आणि आम्ही पण त्याला इगा म्हणू लागलो. यश असे त्याचे नाव उच्चारले तर फारसा प्रतिसाद त्याच्याकडू मिळत नसायचा मात्र इगा बोललो तर लागलीच बघायचा.एकदा सर्व मुलांना आम्ही सांगितले की, खेळतांना याला पण सोबत घेत चला आणि तेंव्हापासून त्यांच्यात खेळताखेळता तो शाळेत खूप रमू लागला.असा होता हा इगा.! दिवस,वार,वेळ असे त्याला काही कळत नव्हते. पण आता दुपार म्हणजे जेवणाची वेळ हे मात्र त्याला बरोबर कळायचे.मध्यान्ह भोजनाच्या वेळेत इगा सर्व मुलांमध्ये जेवायला न बसता सर्वांचे भोजन झाल्यावर आम्हा शिक्षकात जेवायला बसायचा. माझ्याशी त्याची सलगी किंवा जवळीक असल्यामुळे जेवण्याची वेळ झाली की त्याची लगबग वाढायची. वर्गात एका कोपऱ्यात ठेवलेला माझा जेवणाचा डबा त्याला स्वतःला माझ्याकडे घेऊन यायला खूप आनंद वाटायचा. मग इगा,इगा करत त्याच्या हातातील माझा जेवणाचा डबा तो माझ्याकडे द्यायचा.आम्ही सर्व शिक्षक त्याला जवळ बसवून जेवायचो. माझ्या डब्यातील पहिला घास त्याला मी भरविल्याशिवाय मला जेवण कधीच रुचले नाही.कधी कधी तो हळूच आमच्या ताटातील चपाती किंवा इतर पदार्थ हळूच

घ्यायचा. असं त्याचं वागणं होतं.असा होता इगा.!!

एकदा असंच शाळेत साहेब भेट द्यायला आल्याने जेवणाला बराच उशीर झाला.तोवर तोदेखील जेवला नव्हता मात्र आमचे लक्ष साहेबांकडे होते.आमची वाट पाहून तो दमला होता हे त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होते पण साहेबांसमोरून मला उठता येत नव्हते.भुकेचा आगडोंब त्याच्या पोटात उसळल्याने तो खूप रागावला,आदळआपट करू लागला मी काही बोलणार,तोंडातून ओघळणारी लाळ पुसणार इतक्यात तो दुसऱ्या वर्गखोलीत गेला आणि त्याच्या दप्तरातील पुस्तके त्याने रागाच्या भरात अस्ताव्यस्त फेकून देऊन दप्तराची पिशवी डोक्यात घालून बेंचवर जाऊन बसला. त्यानंतर तो कुठे गेला म्हणून मी पाहतो तर काय, माझा डबा घेऊन त्याने स्वतःच जेवण्यास सुरुवात केली.असा होता इगा.! कामाच्या व्यापामुळे कधी मी त्याला जवळ घेतले नाही किंवा त्याच्याशी बोललो नाही तर तो चिडचिड करायचा.त्यातून माझा मूड नाही,मी नेहमीसारखा बोलत नाहीय हे तर त्याला अचूक कळायचे. अशावेळी तो त्याच्या लीलया सुरू करायचा. खरंतर मनकवडा आणि माझ्या प्रेमाचा भुकेला होता तो.माझ्या अबोलपणावर तो माझ्या नकळतपणे पाठीमागून येऊन मला हळूच चिमटा काढायचा किंवा गुदगुल्या करायचा किंवा झालेच तर अगदी माझ्या टेबलाखाली गुपचूप येऊन आडवा होऊन माझ्या चेहऱ्याकडे पाहून माझा अबोलपणा दूर करण्याचा प्रयत्न करायचा.त्याच्या ह्या बालक्रीडेने मग मी सर्व ताण विसरून त्याला जवळ घ्यायचो आणि त्याचा आणि माझा चेहरा फुलायचा. दिवसभर शाळेत असतांना तो स्वतःला हरवून जायचा.पण सुटीच्या दिवशी त्याचे पालक त्याला सोबत शेतात घेऊन जायचे मात्र त्यांची नजर चुकवून तो गावात कुठेतरी फिरत बसायचा आणि शेवटी शाळेच्या व्हरांड्यात येऊन तासनतास बसायचा. शोधाशोध करून मग त्याचे आईवडील त्याला शाळेच्या व्हरांड्यावरून समजावून कसेबसे घरी घेऊन जात.असा होता इगा.!

एकदा उन्हाळ्यातील सुट्टीत कसल्यातरी सर्व्हे च्या निमित्ताने मी गावात गेलो.इतका वेळ शाळेच्या पायऱ्यांवर बसून असलेल्या इगाला कसे काय माहित पडले कुणास ठाऊक.त्याला जसे समजले की मी आलोय तेंव्हा तो रस्त्यावरून वाहनांना न बघता धावत पळत सुटला.तश्यातच एका दुचाकी वाहनधारकाने कसेतरी त्याला चुकविले आणि त्यातच इगा देखील पडला.गुढग्यातून रक्त येऊ लागले पण त्याकडे त्याचे लक्ष नव्हते.त्याला ओढ होती मला भेटण्याची.धावतच येऊन 'इगा,इगा' करत त्याने मला घट्ट मिठी मारली.असा होता इक्षा.! आज जवळजवळ ८ वर्षे झाली. त्याला सोडून मी माझ्या स्वजिल्ह्यात रुजू झालोय, पण इगाला कधीही विसरू शकलो नाही.इगा आता मोठा म्हणजे पंधरा-सोळा वर्षाचा झाला असेल ! त्याच्यात खूप सुधारणा झाली असेल ना ? पण कसा दिसत असेल तो ? मी आल्यानंतर माझा विरह त्याने कसा सहन केला असेल ? माझ्याप्रमाणेच त्याला इतरांनी जवळ केले असेल का ? त्याची अबोल भाषा इतरांना समजत असेल का ? मला येते तशी त्याला माझीही आठवण येत असेल का ? पुन्हा त्याची माझी भेट कधीच नाही का होणार ?आणि झालीच भेट तर तो मला ओळखेल का ? असे अनेक प्रश्न अनेकदा माझ्यासमोर येतात आणि मी क्षणभर हरवून जातो त्या मंतरलेल्या दिवसात. याच जाणिवेने मला इतक्या वर्षात जेंव्हा जेंव्हा आठवण आली तेंव्हा तेंव्हा मी त्याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला मात्र त्यावेळेस त्या शाळेवर असणाऱ्या शिक्षकांची बदली झाली होती तर एकजण सेवानिवृत्त झाले होते.माझ्याकडे ज्या ग्रामस्थांचे मोबाइल नंबर होते ते बदलेले असल्याने माहिती मिळाली नाही पण माझे प्रयत्न सुरूच होते. योगायोगाने हा लेख लिहित असतांना सोशल मीडियावर माझ्या हस्तकलेच्या कलाकृतींची पोस्ट एका समूहातून

दुसऱ्या समूहात फिरतांना मुंबईस्थित माझ्या एका माजी विद्यार्थ्यांच्या पाहण्यात आली.त्यावरील माझ्या लिंकद्वारे त्याने माझ्याशी संपर्क केला.एकमेकांची विचारपूस झाल्यानंतर मी त्याला इगाबाबत विचारले.त्यालाही फारसे माहित नव्हते.तेंव्हा मी त्याच्याकडून अपेक्षा केली की, कोकणात गावी जाशील तेंव्हा इगाची माहिती घे आणि आवर्जून मला फोन कर. माझी आतुरता पाहून दोनच दिवसात तो गावी गेला आणि त्याच्याकडून मला इगाची माहिती मिळाली की,' इगा आता मोठा झालाय.शारीरिक वाढ झालीय त्याची पण मानसिक वाढ झालीच नाही.आधी होता त्यापेक्षा तो अधिक मतिमंद झालाय.मी होतो तेंव्हा शाळेतील मुलं त्याला इगा म्हणत पण आता गावातील सारी मुले-माणसे त्याला वेडा म्हणतात.' म्हणजेच यश चौथीपर्यंत मी होतो त्याच शाळेत होता त्यानंतर त्याचे नाव तालुक्यातील विद्यालयात नाखुषीनेच टाकले पालकांनी. मात्र खेडेगावातून बस ने येताजाता त्याला इतर मुले त्याला हसत- चिडवत, त्याच्या मतिमंदत्वामुळे त्याला सर्वजण कसेतरी वागणूक देत. स्वतःवर नियंत्रण आणि समायोजनाचा अभाव असल्याने काही दिवस त्याचे बाबा त्याच्यासोबत शाळेत जात मात्र तो तिथेही स्वस्थ बसत नसे आणि कामधंदा सोडून पालकांना त्याच्यासाठी वेळ देणे जिकरीचे होऊ लागले.त्यानंतर पाचवीच्या प्रवेशानंतर ते आजपर्यंत त्याचे नाव फक्त एका इयत्तेतून दुसऱ्या इयत्तेत गेले तो मात्र इगा पुढे गेलाच नाही.सध्या तो घरीच असतो आपल्याच तंद्रीत- स्वमग्नतेत. आताही तो केवळ इगा ,इगा करत असतो जेव्हा जे मिळेल ते खातो आणि दिवसभर कधी इकडे तर कधी तिकडे असा भटकत असतो.हे सर्व ऐकताना माझ्या हृदयाला खूप चरे पडत होते मात्र हे वास्तव होते जे स्वीकारावे लागले. व्हिडिओ कॉल करून गुरुजींशी त्याचे बोलणे करून देऊया किंवा किमान त्यांना तो दिसेल तरी म्हणून माजी विद्यार्थ्याने प्रयत्न केला मात्र तो एहे ठिकाणी स्वस्थ बसत नव्हता किमान फोटो तरी काढावे म्हणून मोबाईल त्याच्यासमोर धरला तसा तो धावत सुटला. त्यातूनही त्याला जसे जमेल तसे फोटो काढून त्याचे फोटो मला पाठवले.असा कसा झालाय इगा ? चौथीनंतर इगाला जिल्ह्याच्या ठिकाणी मतिमंदांच्या शाळेत त्याला पाठवा असे ग्रामस्थांनी-शिक्षकांनी त्याच्या पालकांना वेळोवेळी सांगितले होते मात्र पालकांनी कुणाचेच ऐकले नाही.कदाचित जिल्ह्याच्या मतिमंदांसाठी असणाऱ्या शाळेत त्याला स्वतःचे समायोजन करता आले असते त्यात काही बदलही झाला असता. मात्र यासाठी कमी पडले ते पालक आणि काहीसे आम्ही शिक्षकसुद्धा !!! आपण सारेच शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना समृद्ध अध्ययन अनुभव देतो आणि त्यांना विकसित करतो.पण हे करतांना प्रत्येक बालकाच्या शिक्षणासह मानसिक आणि भावनिक गरजादेखील असतात त्या मात्र विसरतो. त्यातच इगासारख्या विशेष गरजा असणाऱ्या बालकांना चाकोरीबाहेर जाऊन त्यांचेही जगणे आपणांस समृद्ध करावयाचे आहे ते सोयीस्कररित्या विसरतो.या गरजा ओळखण्यासाठी आपल्या प्रत्येक शिक्षकातल्या जाणिवा तितक्याच प्रगल्भ असणे महत्वाचे असते. सागरातील सारीच गलबत किनाऱ्यावर पोहोचत नाहीत तर काहींना आधाराची गरज असते.इगासारखे असे अनेक बालक असतील त्यांना आपल्याला फार काही नाही देता आले तर मायेची ऊब तर नक्की देता येईल. ज्यातून आपल्याला एक माणूस घडविता येईल. नाहीतरी शिक्षणाचे अंतिम ध्येय हे माणूस निर्माण करणे आहे हे आपण जाणतोच.असो, काही प्रसंग-आठवणी या हृदयात कायमच्या घर करून असतात त्यापैकीच ही एक आठवण.

**(सुनिल मोरे हे जि.प.शाळा चुडाणे ता.शिंदखेडा जि.धुळे येथे उपशिक्षक म्हणून कार्यरत.) संपर्क : ०००००००००**

# परिस्थितीवर मात...

> इयत्ता पाचवी, सहावीला असतांना आम्हा मित्रांनी भविष्यात साधू व्हायचे असे ठरवले होते. आपण म्हणाल की, असे कसे? आम्ही लहान पणी साधूंना पहायचो त्यांची झोळी नेहमी भरलेली दिसायची. हातात पोळ्या भाजीसह चिवड्याची पिशवी पाहायचो. मग साधूला मिळणारे अन्न धान्य पाहून आम्हा मुलांना साधूचा हेवा वाटायचा. आपणही साधू झालो तर आपल्यालाही भरपूर खायला मिळेल या ईर्षेपोटी मोठे झालो की, आपण साधू बनावे असा आमचा मित्रांचा विचार होता.



**सत्तरसिंग पावरा**
शिरपूर-धुळे

मालकातर धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात सातपुड्याच्या मध्यप्रदेश सीमेवरील पायथ्याशी वसलेले छोटेसे खेडेगाव. अदमासे लोकसंख्या असावी साडेतीन हजारांच्या घरात. तापी नदीची उपनदी गोमाई नदीच्या काठावर मालकातर. संपूर्ण आदिवासी पावरा जमातीची लोकं आणि या गावाचे गेली तीस वर्षे सरपंच पदाचा मान असलेले सत्तरसिंग.

सत्तरसिंग 'दादा' म्हणून पंचक्रोशीत ओळखले जातात. दादा म्हटले म्हणजे भाईगिरी करणारे असावेत असा गैरसमज होतो मात्र सत्तरसिंग त्या विरोधातले. संपूर्ण गावाला आपले कुटूंब मानून त्यांच्या सुख दु:खाची जाण ठेवत कुटूंब प्रमुखाची भुमिका निभावत असल्यानेच 'दादा' म्हणून सारेच संबोधत असावेत.

गरिबीने सत्तरसिंग दादांना ' माणूस' म्हणून जाण दिली. गरिबीनेच सुसंस्कृतपणा दिला. भोगलेल्या हालअपेष्टांनीच सर्वांना आपलेसे केले. पोटाच्या आगीनेच संघर्ष शिकवला. भुकेल्या पोटाची खळगीनेच भविष्याच्या पाया रचला. डोक्यावर दगड वाहून केलेल्या कष्टांनीच 'भाकरीचे महत्व' समजावले.

शिक्षणाने 'माणुस सुसंस्कृत' होतोच असे नाही तर कमी शिकला तरी 'चांगला नागरीक' होऊ शकतो याचं उदाहरण सत्तरसिंग दादांनी घालून दिले आहे. तीस वर्षे सरपंच पद भोगणारे व सध्या शिरपूर पंचायत समिती सभापती म्हणून काम पहाणारे सत्तरसिंग नारखा पावरा यांचा जीवनपट त्यांच्याच शब्दात !

कौटुंबिक पार्श्वभूमी-

मालकातर व बोराडी परिसरात १९७०-८० च्या दशका अगोदर जंगल होते. पुष्कळ झाडी होती. या भागात जंगल कामगार सोसायट्या असायच्या. ठेकेदारांना लाकूडतोडीचा परवाना मिळायचा. जंगलातील विशिष्ट भागातील झाडे तोडण्याची परवानगी मिळायची. त्यांना कुप म्हणत. या झाडे तोडीच्या कामावर वडील जंगल मजूर होते. आई वडिल दोघेही मजूर. आठवड्याला मजूरी मिळायची. त्यावरच संसार चालायचा. त्यात आम्ही पाच भाऊ एक बहीण. एवढा संसार ओढतांना आई वडिलांचेही हाल व्हायचे. मात्र इलाज नव्हता. पोटभर अन्नाची

मारामार व्हायची. गावात कुठे सार्वजनिक कार्यक्रम असला की, पंगती उठत. त्या पंगतीत पोटाची भूक भागवायचो. चवीचा तर विषयच नव्हता.

माझ्या मामाच्या गावी भुलाणे (नंदुरबार-शहादा) मजा यायची. मामाकडची आर्थिक परिस्थिती गरिबीची होती. त्यात माझ्या आजोबांना (आईचे वडील) सात बायका होत्या. खूप मोठ कुटूंब होतं. सारा गावच नात्यागोत्यात. खायला काही ना काही मिळेच. खायला मिळते म्हणून मामाच्या गावाला पायीच जायचो. लंगडीभवानी-मलगाव अशी गावे रस्त्यात लागत. उड्या मारत, पळत, खेळत मामाच्या गावी पोहचायचो. खेळायला सवंगडीही भरपूर. मजा यायची. प्राथमिक शिक्षणासाठी (१९५८) मी पहिली इयत्तेत दाखल झालो.

आमच्या मालकातर गावात जिल्हा परिषदेची शाळा होती. शाळा म्हणजे भले मोठे कुडाचे घर. इमारत नाही. लाकडी दांड्या, झाडांची पाने, यांचा वापर केलेले कुडाचे घर म्हणजे आमची शाळा. पाणी नाही, स्वच्छतागृह नाही की मैदान नाही. बसायला सारवलेली खडकाळ जमीन. या घरात पहिली ते चौथीचे वर्ग भरत. एकच मास्तर (गुरूजी). आता तुम्ही सर म्हणतात. ताराचंद वना चित्ते अजुनही नाव आठवते. खूप धाक वाटायचा त्यांचा. घरी राहिलो तर दहा बारा मुलांना सोबत आणायचे नि ओढून शाळेत घेऊन जायचे. मी बहुतेकदा दांडी मारायचो. कारण माझ्याकडे कपडे नव्हते. लंगोट घालूनच शाळेत जायचो. लाज वाटायची पण गुरूजींची भिती होती.

शाळेत १०० मुले हजर असायची कारण तेव्हा शाळेत गोड शिरा मिळायचा आणि या शिऱ्यासाठीच शाळेत येणारे जास्त होते. जेव्हा गुरूजी शिरा वाटत तेव्हा मुलांबरोबर पालकही उभे रहात. गुरूजींनी त्यांना कधीच हाकलले नाही. थोडा थोडा शिरा सगळ्यांनाच वाटत.

आणि या शिऱ्यासाठीच आमची शाळा होती. अभ्यास करायचो. बाराखडी, पाढे, पाठांतर व्हायचे मी सर्व मुलात हुशार समजलो जायचो. थोडं लिहायला वाचायला शिकलो. गावाशेजारी नदी असल्याने आम्ही मित्र नदीवरच असायचो. पोहणे, मासे पकडणे हा छंदच. आम्ही शाळेत बसलो कि गुरूजी हमखास नदीवर घ्यायला येत.

दरम्यान माझ्या आई वडिलांना काम मिळत नव्हते. मजुरी नाही म्हणून खायला नाही. अशावेळी कामाच्या शोधात जोयदा, वकवाड, जळोद येथे राहिलो. त्यात जळोद गावाला काम मिळाले. पावसाळ्यात चारा तोडणे नंतर मोळ्या विकणे यावर गुजराण होऊ लागली. या फिरण्यात माझ्या भावांची शाळा सुटली, मी मात्र शिकतच राहिलो.

कर्मवीर व्यंकटराव रणधीर (स्वातंत्र्य सैनिक) यांना सारेच आण्णाबाबा म्हणायचे. त्यांनी बोराडी या मध्यवर्ती ठिकाणी शाळा आणि वसतीगृह सुरू केले होते. ते गावागावात फिरायचे. शिक्षणाचे महत्त्व पटवायचे. मुलांना शाळेत घेऊन जायचे. वसतीगृहातील मुलांसाठी धान्य गोळा करायचे.

एकदा आण्णाबाबा आमच्या गावात आले. आठ-दहा मुलांनिशी मलाही पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालय बोराडी येथे पाचवीत दाखल केले. तेथे वसतीगृहात रहायची सोय. खायला मिळायचे आणि शिकण्यापेक्षा पोटभर खायला मिळते या आशेपोटीच पाची सहावी शिकलो.

माध्यमिक शिक्षण -

आण्णाबाबांनी शिरपूरला देखील शाळा आणि बोर्डींग सुरू केले होते. आमच्या काही मुलांची रवानगी शिरपूरला झाली. माझे आई वडील मजूरी निमित्ताने भटकायचे मिळेल ते खायचे. त्यापेक्षा मला शाळा आवडू लागली. शिरपूरला शंकर पांडू माळी विद्यालयात दाखल झालो. मला कपडे नव्हते. पहिले सहा महिने तर मी एकाच चड्डीवर काढले. तीही फाटकी सैल होती. म्हणून त्यावर काळा करदोडा (दोरा) बांधलेला. इतर मुले टिंगल करायची. मात्र मला खायला मिळते या आशेनेच मी सारे सहन केले

शामराव नामदेव पाटील हे जंगल कामगार सोसायटीचे काम पहायचे. त्यांनी मला खाकी चड्डी नि शर्ट घेऊन दिला. शिक्षणापेक्षा भूक महत्त्वाची हाती. पंडीत मोरे म्हणून सर होते. कडक शिस्तीचे लहानशी मुर्ती होती. त्यांचा मार अजुनही आठवतो.

शांताराम भाऊसाहेब हे रेक्टर होते. वसतीगृहाचे प्रमुख शांताराम भाऊसाहेबांची खूप भिती वाटायची जवळच अरूणावती नदी होती. आम्ही आदिवासी मुले नदीवर गेलो कि ते (याजदी) गाडी घेऊन यायचे नि समजावून न्यायचे आणि नंतर चमकवयाचे. सणासुदीलच घरी यायचो. पोळा, होळी, दिवाळी तर ठरलेलेच. घरी आलो म्हणजे आठ दहा दिवस जात नव्हतो. सातवी ते नववीचा काळ असाच मजेत गेला. पुढे दहावी अर्धवट शिकलो. दहावीची परिक्षाही दिली नाही.

लग्नाची गोष्ट (१९७८)

मी दहावीला असतांनाच वडील गावी घेऊन गेले. कामासाठी चल, परिक्षेला येऊ असे सांगितले. घरी गेलो. कामापेक्षा माझ्या लग्नाचीच चर्चा ऐकू आली. आमच्या नात्यातील मुलीशी लग्न कर म्हणून आग्रह धरू लागले. मी मात्र दहावी पुर्ण करतो मग बघू असे सांगू लागलो. लग्न अगोदर, शिक्षण नंतर यावर वडील ठाम. आणि माझी होणारी बायको म्हणजे आम्ही बालपणापासूनचे मित्रच. एकत्र खेळलेलो. आमच्या घरीच राहिलेली. शेवटी मी 'हो' म्हटले तर काही कारणांनी वडील नाही म्हणू लागले. शाळा तर सुटलेलीच. शेवटी मी आणि ती असे दोघेही पळालो. लग्न केले. वडिलांनी परत आणले, वाद झाले पण आम्ही दोघांनी संसार करायचाच ठरवल्याने साऱ्यांचा नाईलाज झाला आणि आमचे लग्न लावले.

समाजकार्य

लग्नामुळे शाळा तर सुटलेली. आता पोटापाण्याचा प्रश्न सोडवणे गरजेचे. जवळच धरणाचे काम चालू झाले होते. तेथे आम्ही दोघांनी मजूर म्हणून काम सुरू केले. सारे धरण माणसांनी दगडमाती वाहून बांधले. चांगली मजुरी मिळायची.१९८०-१९९० च्या काळात येथेच मजूर संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांशी ओळख झाली. त्यांचेसोबत फिरू लागलो. अन्यायाविरोधात लढा सुरू केला. मजुरांचे प्रश्न मांडू लागलो. दोन बुकं शिकलो होतो. अन्याय समजू लागला होता. नेतृत्व गुण अंगी होते. मित्र संग्रह वाढत होता.

सरपंच

१९९० साली आमच्या गावाच्या ग्रामपंचायतीची निवडणूक बिनविरोध झाली. मला सरपंच केले. समाजकारण सुरू झाले. राजकारणी स्वभाव नव्हता. छक्केपंजे येत नव्हते. मात्र पोटात 'गरीबी' होती. गरिबांविषयी कणव होती. होणाऱ्या त्रासाची कल्पना होती. म्हणून लोकांसाठी काम करू लागलो. झटू लागलो आणि म्हणूनच आतापावेतो लोकांनी माझ्यावर विश्वास ठेवला नि तब्बल तीस वर्षे सरपंच म्हणून काम पहात आहे. शिरपूर तालुक्याचे आमदार अमरीशभाई पटेल व भूपेशभाई पटेल यांच्या आदर्श विचारांचा पगडा माझ्यावर आहे. जे करायचे ते चांगले करायचे म्हणून त्यांचेसोबत गेली तीस वर्षे काम करतो आहे. त्यांनी देखील माझ्या कामाची पावती म्हणून पंचायत समितीचे सभापतीपद दिले आहे.

आता माझे शिक्षण अर्धवट सुटले, शिकावेसे वाटले, परिस्थितीने शिकु दिले नाही. मात्र मी माझ्या मुलांना (दोन मुले एक मुलगी) शिकवले. ते ग्रॅज्युऐट झाले नि नोकरीला लागले.

आता दोन वेळ पोट भरून खायला मिळते. कष्टाच्या भाकरीची चव वेगळीच असते. मिळवलेल्या भाकरीचा अभिमान वाटतो. आणि त्याचबरोबर गरिब समाजाप्रती आजही तसाच संवेदनशील आहे. त्यांना सोबत घेऊन चालण्याचा प्रयत्न करतो आहे. अडीअडचणींना मदतीस धावतो आहे.

**संपर्क - सत्तरसिंग पावरा - ८१२०९५२५९८**

शब्दांकन- संदेश हजारे

“

**समान वैशिष्ट्यांच्या आधारे सजीवांचे वर्गीकरण केले जाते. पण काही सजीव असे असतात की,त्यांचे समजातीपेक्षा एखादे वैशिष्ट्ये वेगळे असते किंवा दुसऱ्या जाती / प्रजाती/ वर्गाची वैशिष्ट्ये त्यांच्यात आढळून येतात. अशी विचित्र संगम असलेली वैशिष्ट्ये त्या सजीवांना वेगळेपण प्राप्त करून देतात, ते अधोरेखित करणारे हे सदर ‘आम्ही आहोतच वेगळे!’**

”

# विलक्षण कीटक



**डॉ.नंदा हरम**
पुणे

महेशः आई, कीटकांना माझा सलाम!

आईः काय रे बाबा एवढी कसली आश्चर्यजनक माहिती मिळाली तुला, रे कीटकांबद्दल!

महेशः अगं... मला बागेत एक टोळ सापडला. नेहमीच्या टोळापेक्षा तो वेगळा होता. त्याची माहिती बघत असताना माझ्या वाचनात आलं की जगात ९ लाख वेगवेगळ्या प्रकारचे कीटक अस्तित्वात आहेत.

आईः बाप रे!... प्रचंड आकडा आहे हा!

महेशः हो ना... एवढंच नाही तर दुसऱ्या कोणत्याही प्राण्यांच्या एका गटापेक्षा कीटकांच्या प्रजातींची संख्या खूप जास्त आहे. आणि आई... त्यांच्यात विविधताही खूप आहे.

आईः व्वा! म्हणजे आज मला छानशी माहिती ऐकायला मिळणार तर!

महेशः नक्की! मला ही सांगायला आवडेल. ब्राझिलियन वृक्षतोडी हा कीटक. त्याच वैज्ञानिक नाव आहे, बोसायडिअम ग्लॉक्युलरी (Bocudium globulare). हा सर्व जगभरात आढळतो, पण मुख्यत्वे तो आफ्रिका, उत्तर आणि दक्षिण अमेरिका, आशिया आणि ऑस्ट्रेलियात जास्त प्रचलित आहे.

आईःत्याचं वेगळं असं वैशिष्टय काय आहे.!

महेशःसांगतो ना. आकाराने तो लहान, जेमतेम ५-६ मिमी, वाटाण्याएवढा असतो. पण त्याच्या डोक्यावरचा अवयव बघ



आकृती क्रं.१

एखाद्या हेलिकॉप्टरप्रमाणे, एखाद्या परग्रहावरच्या प्राण्यासारखा वाटतो,नाही.!

आईः हो रे... ते डोळ्यांसारखे भासतात ना?

महेशः हो.. पण ते दिखाव्यापुरतेच आहेत. त्यांचं नेमकं कार्य काय? हे अजुन कळलेचं नाही.

आईः भक्षकांना फसविण्याकरिता असेल!

महेशः या शक्यतेचा विचार केला होता. पण त्याला पुष्टी मिळेल, अशी निरीक्षणं उपलब्ध नाहीत.

आईः मग हा अवयव दुसऱ्या कोणासारखा दिसत असेल?

महेशः आई, किती हुशार आहेस ग! कसं कळलं तुला!

आईःहल्ली आपण वेगवेगळ्या सजीवांविषयी इतक्या गप्पा मारतो, त्यावरून आपला अंदाज केला.

महेशः तुझा अंदाज अगदी बरोबर आहे. ओकिओकार्डिसेप्स युनिलॅटरॅलिस (Ophiocor dyceps unilateralis ) नावाची एक कीटक-रोगजनक बुरशी आहे. ही मुंग्यांच्या शरीरावर वाढते. त्यातून ती जेव्हां बाहेर पडते. तेव्हां तयार होणारी रचना आपल्या या कीटकाच्या हेलिकॉप्टरप्रमाणे दिसते.




(आकृती क्रं.२)

आईःबरं, बरं, आलं लक्षात. भक्षकाला हा ब्राझिलियन कीटकाचा अवयव म्हणजे बुरशी आहे असं वाटतं. म्हणून भक्षक त्यावर हल्ला करण्याचं टाळतात.

महेशः अगदी १०० टक्के अचुक सांगितलंच बघ! हे निराळेपण सोडलं, तर हा कीटक इतर कीटकांसारखाच आहे.पानाचा खालचा भाग खाऊत हा कीटक जिवंत रहातो.

आईःमहेश, किती वैविध्य आहे या सजीवांत! नवल वाटतं, एकेक बघून, वाचून...

महेशः हो ना, म्हणूनच तर मला अजिबात कंटाळा येत नाही, या संजीवांविषयी जाणून घेताना. एक विलक्षण किडा आहे, आई त्याचं नाव 'ट्रायलोबाइट बीटल' (Trilobite beehe). ट्रायलोबाइट या सजीवाविषयी माहिती आहे का तुला?

आईः कधीतरी त्याचा संदर्भ आला आहे, पण आत्ता आठवत नाही. सांग बरं.

महेशः अग, ट्रायलोबाइट हा एक समुद्रचर, संधिपाद प्राणी होता. त्याचं शरीर तीन खंडाच्या स्वरूपात असल्यामुळे तो सहज ओळखता यायचा. सुमारे ५४२ दशलक्ष वर्षांपूर्वी तो अस्तित्वात होता. जवळ-जवळ २५१ दशलक्ष वर्षांपूर्वी तो नामशेष झाला. हो नामशेष झाल्यानंतर २०० दशलक्ष वर्षांनंतर ट्रायलोबाइट किडा अस्तित्वात आला.




(आकृती क्र. ३ पहा)

आई, त्या दोघांची चित्रं पाहिल्यावर त्यांच्यातील साम्य तुझ्या लक्षात येईल.

आईः ट्रायलोबाइट समुद्रचर प्राण्याचं हे जीवाश्म आहे तर! हं.... हेच कधीतरी वाचनात आलं असणार...!

महेशः या किड्याने शास्त्रज्ञांना गेले जवळ-जवळ २०० वर्ष गोंधाळात टाकलं आहे.!

आईः ते कशामुळे?

महेशः अग, ते वेगळंच प्रकरण आहे. १८०० साली ज्या शास्त्रांज्ञानी या किड्यांचा शोध लावला. ते चक्रावून गेले. कारण हा किडा कसाही असो- म्हणजे चपटा, टोकेरी, जांभळा, हिरवा, काढा... सगळे किडे या मादीच!

आईः हे काय नवीन! मग काय झालं पुढे?

महेशः १९२२ मध्ये स्वीडिश प्राणीशास्त्रज्ञ, एरिक मजोबर्ग (Exic Mjoberg) बोर्नियामध्ये आला, ती मनाशी प्रतिज्ञा करूनच... की बोर्निओ- मधील ट्रायलोबाइटच्या अळयांचा प्रश्न सोडवायचाच.

आईः या अळया, मध्येच कुठून आल्या!

महेशः अग, किडे सापडले ना, एकतर त्या सर्व मादी होत्या आणि त्याही अळ्यांच्या रूपात!

आईः कीटकांमध्ये अळीही त्यांच्या जीवनच्रकाची पहिली अवस्था असते ना!

महेशःहो... तीच तर गंमत आहे. अग, प्रजोत्पादन होण्याकरिता नर आणि मादीचं मीलन व्हायला हवं, त्याकरिता लागणांर लैंगिक छिद्र या अळीच्या अंगावर कुठे दिसतच नव्हतं.

आईः अळ्या तर भरपूर संख्येत सापडत होत्या, मग नेमकं काय घडत होतं?

महेशः तेच तर! मजोबर्ग चांगलाच कोड्यात पडला होता. अनेक वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर ही त्याला पूर्ण वाढ झालेली मादी काही सापडत नव्हती.

आईः मग... कधी सापडली मादी?

महेशः शेवटी एकदा त्याला अंगाचं मुटकुळं करून बॉलच्या स्वरूपात एक मादी सापडली. बरेच दिवस ती त्याच अवस्थेत मेल्यागत पडलेली होती. ती पांढुरकी- पिवळसर झाली. तिचं स्थित्यंतर पूर्ण झालं आणि ती वळवळायला लागली. फरक हा होता, तिची पूर्ण वाढ झाली होती आणि विशेष म्हणजे प्रजननाकरिता आवश्यक असणाारं लैंगिक छिद्र ही आता दिसत होतं. तिने अंडी घालायला सुरूवात केली. पण मजोबर्गला नर किडा सापडला नाही. त्या मादीने शेकडोच्या संख्येत अफलित अंडी घातली आणि ती मेली.

आईः मजोबर्गला नर किडा सापडला की नाही.!

महेशः पुढल्या वर्षी मजोबर्गने तेथील स्थानिक लोकांना, जो कोणी नर किडा आणून देईल. त्याला १० डॉलर्सचं बक्षीस ठेवलं.

आईः पैशाच्या आशेने लोकांनी चांगलेच प्रयत्न केले असतील ना?

महेशः अगदी खरं आहे, तुझं म्हणणं! शेवटी एके दिवशी सकाळी एक माणूस केळीच्या पानात नरं-मादीची जोडीच घेऊन आला मजोबर्गला आनंद झाला की त्याला नर ट्रायबोलाइट किडा बघायला मिळाला.

आईः कसा होता तो?

महेशः तो छोटासा, काळे पंख असलेला किडा होता. मादीच्या एक दशांश आकाराचा होता. मादीसारखा चटकन नजरेत भरणारा नव्हता. मजोबर्गची खात्री झाली की मादी ट्रायबोलाइट प्रदीर्घ काळ अळीच्या रूपातच रहाते. चांगली मोठी पिल्ल होण्याकरिता ती आपली ऊर्जा वापरते.

आईः काही वेगळीच कथा आहे नाही या किडयाची?

महेशः अग... परत अशी नर-मादीची जोडी


मिळायला ६०-७० वर्ष लागली. १९९३ साली अल्विन टी.सी. वाँगला अशी जोडी मिळाली. फलित अंड्यातून बाहेर येणाऱ्या जीवाचं त्याला निरीक्षण करायचं होतं. जन्मापासूनच नर मादीपेक्षा वेगळा दिसतो का? तसेच वाढ झाल्यांवर काय बदल होतो, त्याचा अभ्यास त्याला करायचा होता.

आईः मग... माशी कुठे शिंकली?

महेशःअग, अंड्यातून बाहेर येणारे जीव मेले. त्यामुळे हा किडा काय खातो इ. सर्व अभ्यास त्याला करताच आला नाही.

आईः दुर्देव म्हणायंच...ट्रायलोबाइटच !

महेशः हो ना... त्यामुळे यसा ट्रायलोबाइटचं गूढ तसंच राहिलंय. वाँगचे प्रयत्न चालू आहेत.




(आकृती क्र. ४ पहा)

आईः संशोधन करताना चिकाटी केवढी महत्त्वाची असते ना?

महेशः१९९६ मध्ये मलेशियात वाँगला थोडंसं यश मिळाले.त्याला नवीन प्रजाती, ड्युलिटीकोला होयझेनि (Duliticola hoiseni) मलेशिया आणि सिंगापूर येथे सापडली. तिथे त्याला नर आणि मादीचा जोडीचं निरिक्षण करता आलं.

आईःअरे व्वा! नवीन माहिती मिळाली का?

महेशः नर आणि मादी यांचं मीलन ५ तास चालू होतं. नराने मादीला सोडल्यानंतर ३ ते ४ तासातच नर मेला. दुसऱ्या दिवशी मादीने भरपूर अंडी घातली. ती एकमेकांना चिकटलेली होती दोन आठवड्यानंतर मादी मेली, पण त्यापूर्वी तिने २०० अंडी घातली. दुर्देवाने, त्या अंड्यांतून जीव बाहेर आले नाहीत. फक्त ३ अळ्या बाहेर पडल्या. त्या अळ्या साधारण ६-८ मिमी लांबीच्या होत्या. ही पहिलीच वेळ होती, की अंड्यातून बाहेर आलेल्या अळ्यांची नीट नोंद घेतली.

आईः शेवटी यश आलं तर!

महेशः पण तीन आठवड्यानंतर या अळ्या मेल्या, त्यामुळे परत एकदा त्यांच्या जीवनचक्राची माहिती नीट मिळू शकली नाही. काही प्रश्न अनुत्तरितच राहिले, ते असे- नर अळी मादी अळीपेक्षा पहिल्या पासूनच वेगळी असते का? मादीने घातलेल्या ३०० ते ४०० अंड्यापैकी किती नर आणि किती मादी तयार होतात? नर अळ्या कुठे आणि कशा राहतात, वाढतात..

आईः एवढेसे जीव...केवढे नाचवतात आपल्याला!

**(आकृत्या किंवा चित्रे माहितीजालाच्या सौजन्याने) संपर्क : ९३७२९१०३०६**

# लॉकडाऊन काळातील शैक्षणिक प्रयत्न



**चेतन पाटील**
अक्कलकुवा, नंदुरबार

> "आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत उत्कृष्ट पद्धतीने पोहचविण्यासाठी मी विज्ञान अभ्यासमालाची सुरुवात १ जुलै २०२० पासून केली. या अभ्यासमालिकेत मी इयत्ता नववी व दहावी या वर्गांचा विज्ञान विषयाचा समावेश केला. अभ्यासमाला निर्मिती करण्यामागे एकमेव हेतू असा होता की, कोरोना काळात विद्यार्थी हा शिक्षणापासून दूर जाता कामा नये व तो शिक्षणाजवळ असावा. त्यासाठी त्यांनी स्वतः कृती करावी म्हणून मी अभ्यासमालिकेची सुरुवात केले. यामध्ये मी स्वतः रोज एक उपघटक यावर आधारित अध्यापन करीत असलेला युट्यूब व्हिडिओ तयार करायचो व तो व्हिडिओ त्या मालिकेत समाविष्ट केला की, त्याचाच आधारावर विद्यार्थी कृती जसे की,हे करून पहा, शोधा पाहू, सांगा पाहू, विचार करा, थोडे आठवा यासारख्या बाबींचा समावेश त्यात करण्यात आला."

मार्च २०२० पासून कोरोना प्रादुर्भाव सुरुवात झाली. या काळात दुकाने व सर्व व्यवसाय, वाहतूक सर्व जनजीवन ठप्प झाले. अशा परिस्थितीत शाळाही बंद झाल्या. शैक्षणिक वर्ष २०१९- २० चा निकाल मागील परीक्षांच्या आधारावर लावण्यात आला. कोरोना सारख्या महामारीच्या वेदनांची झळ सामाजिक,आर्थिक, राजकीय, औद्योगिक अशा सर्व क्षेत्रांना बसली.याला शिक्षण क्षेत्रही अपवाद राहिले नाही. मार्च महिन्याच्या अखेरीपासून ज्ञानदानाचे कार्य खंडित झाले. प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियेतून शिक्षण प्रक्रियेचा मुख्य केंद्रबिंदू दुरस्थ झाला शाळा बंद झाल्या. मात्र पुढील वर्ष म्हणजे २०२०-२०२१ शैक्षणिक वर्षाची सुरुवात पूर्णपणे कोरोना चा प्रादुर्भावात झाली. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना नेमके अध्ययन-अध्यापन करायचे तरी कसे? हा मोठा गहन प्रश्न होता. कारण माझ्याकडे नववी व दहावी अशा दोन मोठ्या वर्गाचा विज्ञान सारख्या महत्त्वाच्या विषयाची जबाबदारी होती. म्हणून विद्यार्थ्यांपर्यंत आपले शैक्षणिक कार्य सुरू ठेवण्यासाठी व शाळा बंद आणि शिक्षण चालू या भूमिकेत व अशा परिस्थितीत अध्ययन -अध्यापन नेमके कशा पद्धतीने करावी त्यासाठी अनेक पद्धतींचा अवलंब चालू झाले. व्हाट्सअप समूह, झूम मीटिंग, गुगल मीट या सारखे पर्याय उपलब्ध होते. प्रत्यक्ष ऑनलाइन अध्यापन करत असताना ग्रामीण भागात अनेक अडचणी येत होत्या. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांसाठी मी एक छोटासा प्रयत्न म्हणून सर्वप्रथम अध्यापन करण्यासाठी शैक्षणिक व्हिडिओची ची निर्मिती करायला सुरुवात केली, व्हिडिओ माझ्या यूट्यूब चॅनल वर अपलोड केला. यानंतर आपल्या विद्यार्थ्यां पर्यंत उत्कृष्ट पद्धतीने पोहचविण्यासाठी मी विज्ञान अभ्यासमालाची सुरुवात १ जुलै २०२० पासून केली. या अभ्यासमालिकेत मी इयत्ता नववी व दहावी या वर्गांचा विज्ञान विषयाचा समावेश केला. अभ्यासमाला निर्मिती करण्यामागे एकमेव हेतू असा

होता की, कोरोना काळात विद्यार्थी हा शिक्षणापासून दूर जाता कामा नये व तो शिक्षणाजवळ असावा. त्यासाठी त्यांनी स्वतः कृती करावी म्हणून मी अभ्यासमालिकेची सुरुवात केले. यामध्ये मी स्वतः रोज एक उपघटक यावर आधारित अध्यापन करीत असलेला युट्यूब व्हिडिओ तयार करायचो व तो व्हिडिओ त्या मालिकेत समाविष्ट केला की, त्याच आधारावर विद्यार्थी कृती जसे की,हे करून पहा, शोधा पाहू, सांगा पाहू, विचार करा, थोडे आठवा यासारख्या बाबींचा समावेश त्यात करण्यात आला. त्याचबरोबर त्या उपघटक यावर आधारित घरगुती साहित्यातून छोटासा प्रयोग कसा करता येईल? यासंदर्भातील मार्गदर्शन सुद्धा त्याला करण्यात यायचे. जेणेकरून विद्यार्थी दिलेला व्हिडिओ काळजीपूर्वक पाहतील व दिलेली कृती पूर्ण करेल. त्याच बरोबर अभ्यास माला विद्यार्थ्यांना त्यांच्या मोबाईलवर पाठवली जायची. तो विद्यार्थी दिवसभरामध्ये त्याला मिळेल त्या वेळेत तो पाहून कृती पूर्ण करायचा आणि त्या स्वरूपाचे फोटो मला पाठवत असायचा व प्रत्येक प्रकरणावर आधारित एक ऑनलाइन टेस्टचा त्याच्यामध्ये समावेश असायचा. विद्यार्थ्यांनी केलेली कृती व दिलेली ऑनलाइन टेस्ट यात काही सुधारणा असतील तर त्यांच्याशी प्रत्यक्ष फोनवर संवाद साधून त्या सुधारणा करण्यात यायच्या. ज्या विद्यार्थ्यांकडे अँड्रॉइड मोबाइलची सुविधा नसायची अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळच्या वर्गमित्र किंवा पालकांचा मोबाईलवर अभ्यास मला पाठवून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोचण्याचा मी प्रयत्न करत असे. माझी अभ्यासमाला मी माझ्या विद्यालया पुरती मर्यादित न ठेवता त्याचा फायदा इतर विद्यार्थ्यांना सुद्धा व्हावा त्यासाठी मी विज्ञान अभ्यासमाला या नावाचा एक व्हाट्सअप समूह तयार केला, त्यात राज्यभरातून अनेक जिल्ह्यातील शिक्षक व विद्यार्थी यांचा समावेश त्यात झाला त्यातील काही शिक्षकांनी तर या अभ्यासमाला आपल्या विद्यालयात चालवली आणि त्याचा फायदा त्यांच्या विद्यार्थ्यांना कसा झाला यासंदर्भात त्यांनी त्याची प्रतिक्रिया व्यक्त केली विज्ञान अभ्यासमालाचे आतापर्यंत सुरुवातीला पाच-पाच प्रकरणावर आधारित १२१ भाग विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्यात आले. त्यामध्ये मी स्वतः तयार केलेली माझ्या यूट्यूब चॅनल चे एकूण ४० व्हिडीओ त्यात समाविष्ट करण्यात आले त्याचबरोबर काही घटकांसाठी दीक्षा ॲपवरील व्हिडीओचा सुद्धा त्यामध्ये समाविष्ट करण्यात आला.एकूणच तो उपघटक विद्यार्थ्यांना कशा रीतीने योग्य समजेल? यासाठी विज्ञान अभ्यासमाला तयार करण्याचा प्रयत्न करत असे.

दि.२३ नोव्हेंबर पासून शाळा सुरू झाल्या आहेत. काही प्रमाणात का असेना विद्यार्थी शाळेत येत आहेत त्यांच्याकरिता प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन सुरूच आहे. कोरोना सारख्या कठीण काळात विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू राहिले म्हणून सध्या मला खूप अडचणी जाणवत नाही. विद्यार्थीही आनंदी आहेत.

आपले प्रयत्न सतत सुरू ठेवणे महत्त्वाचे असते, मग तो काळ कठीण असो वा नसो, आपला फायदा झाला अस समजा!

**(चेतन रमेश पाटील,श्री सातपुडा वैभव विद्यालय, वाण्याविहिर, तालुका- अक्कलकुवा, जिल्हा- नंदुरबार येथे विज्ञान शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.) संपर्क : ९४२०४४०१८१**

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे **Reg No.**

# लॉकडाऊन... !



सीमा बाविस्कर
शिरपूर

"
सोबती रे तू तुझाच
अन, तुला तुझीच साथ ।
शोधूनी तुझी तू वाट
चाल ऐकला ॥
होवू दे जरा उशी,
सोडतोस का रे धीर?
रात्र संपता पहाट
होई रे पुन्हा
होई रे पुन्हा ॥
"

मानवी इतिहासात पहिल्यांदाच डोळ्यालाही न दिसणाऱ्या एक अदृश्य विषाणू अर्थात कोरोनाने संपूर्ण जगाला विळखा घातला.कोरोनाने देशविदेशात घातलेले थैमान आम्ही प्रसार माध्यमांद्वारे पाहत होतो. ऐकत होतो माणूस माणसाच्या जितक्या संपर्कात येवू लागला तितका आजार पसरू लागला म्हणून यावर आळा घालण्यासाठी शासनाने लॉकडाऊन जाहिर केले. याआधी आम्ही सेप,बंद कर्फ्यु यासारखे शब्द ऐकले होते, अनुभवले होते, पण आता पहिल्यांदाच ऐकणार आणि अनुभवत होतो तो म्हणजे लॉकडाऊन.

सुरूवातीला ज्यावेळी लॉकडाऊन सुरू झाला. तेव्हा, प्रत्येकालाच ४/५ दिवस अगदी विसावा मिळाल्याचा आनंद मिळाला. घराघरातून सकाळ-संध्याकाळ नवनवीन पदार्थ बनू लागले. बनवलेल्या खाद्यपदार्थाचे फोटोज सोशल मिडीयावर व्हायरल व्हायला लागले. 'घरचे सुग्रास, अन्न हेच पूर्णब्रम्ह' याची प्रचिती येऊ लागली. सारं काही अगदी मजेशीर वाटत होतं पण अचानक या आजाराचे स्वरूप एवढे गंभीर व्हायला लागले की, प्रत्येकाच्या कुणा ना कुणा जिवलगाला, अगदी वयाच अंतर न पाहता, त्याच्यापासून अलगद दूर नेण्यात आलं. तेही कधीही परत न येण्याच्या बोलीवर! अगदी त्याची शेवटची भेटही होवू दिली नाही. मृत्यूची अवहेलना तर इतकी की, मृतदेहाला कुणी स्पर्श करू नये. ज्याच्या घरातील व्यक्ती जात होत्या त्याच्या घरातील इतर मंडळी मनाने खचून जात होती. त्यांच्या डोळ्यांवर भितीचे सावट, चेहऱ्यावर चिंता, त्यांच काळीज आक्रंदत राहिलं. प्रत्येकाच्या डोक्यावर टांगती तलवार ठेवली गेली. इतर मंडळीना देखील अंत्य-दर्शन, द्वारदर्शन तर सोडाच पण सहवेदना देखील देता आल्या नाहीत.

या काळात आमच्या दैनंदिन शब्दांमध्ये नवनवीन शब्दांची भर पडली. सोशल डिस्टंस, मास्क, सॅनिटायझेशन, आयसोलेशन, क्वारंटाईन, कोविड, पल्स, ऑक्झिमीटर, पँडेमिक, कम्युनिटी स्प्रेड, इम्यूनिटी, ऑनलाईन या सारख्या शब्दांचा वापर इतका वाढला की एखादी अशिक्षित म्हातारी आजीसुध्दा हे शब्द अगदी बिनधास्तपणे बोलू लागली.

असं म्हणतात की माणसानं नेहमी पॉझिटिव्ह, असाव पण आता हा पॉझिटिव्ह शब्दच वेदनादायी

ठरला. पॉझिटिव्हची जागा निगेटिव्हने घेतली. घराबाहेर पडावे, शतपावली करावी, मॉर्निंग वाक करावा, फिजीकल फिटेनस ठेवावा, जिममध्ये यावे याऐवजी आता घरातच थांबा, बाहेर फिरू नका, कुणाशी बोलू नका, हस्तांदोलन करू नका यासारखे शब्द रूढ व्हायला लागले. रविवारी सुध्दा घरी न थांबणारी मंडळी, तब्बल ७ ते ८ महिने घरातच राहिली. अनेकांनी घरात थांबून आपले छंद जोपासले जणू काही त्यांच्या सुप्त कलागुंणाना पाझरच फुटला !

या काळात सोशल मिडियाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. ज्या मोबाईलला शाळेत आणयला बंदी होती, तोच मोबाईल आता शाळेच्या ऑनलाईन शिक्षणाचं माध्यम ठरला. सोशल मिडीयावर निरनिराळ्या संदेशांची देवाणघेवाण झाली. प्रसंगी काही विनोदी किस्सेही गाजले. वेगवेगळ्या व्हिडीओंच्या माध्यमातून नवीन नवीन माहिती मिळवली परंतु याच काळात हजारोंच्या संख्येने तरूणांच्या नोकऱ्या गेल्या. लाखो लोक बेरोजगार झाले. दुकाने बंद झाली. शेतकऱ्यांचा माल पडून खराब होवू लागला.मजूर न मिळाल्याने पोटच्या मुलाप्रमाणे वाढवलेली पिकं, बागा स्वत:च्या हाताने, कुऱ्हीडीच्या वाराने तोडून फेकावी लागली. खरेदी-विक्रीच व्यवहार थांबले, रहदारी थांबली. प्रवास थांबले, वाहनांनी चक्क ७ ते ८ महीने विश्रांती घेतली.

कधी नव्हे ती प्रार्थना स्थळेही या काळात बंद झाली पण या प्रार्थना स्थळातील भगवंत मात्र पोलिस, डॉक्टर,आरोग्य कर्मचारी,पॅथालॉजिस्ट,सफाई कामगार यांच्या रूपाने जनमानसांत वावरला स्वत:ची व कुटुंबाची फिकीर न करता अहोरात्र झटत राहिला आणि म्हणूनच सामान्य जनतेला घरातच थांबता आले आणि पुन्हा एकदा माणसाला माणुसकीचे दर्शन झाले !

घराघरात काढे उकळू लागले. सकाळ संध्याकाळ हळद, लिंबूचे पाणी पिवू लागले. मला कोरोना तर झाला नाही ना? अशी शंका प्रत्येकाच्या मनात घर करून गेली. साधी शिंक आली, खोकला आला तरी घरातीलच मंडळी संशयाने पाहू लागली. २४ तास चालणाऱ्या वृत्तवाहिन्यांवर केवळ आणि केवळ कोरोना रूग्णसंख्या वाढीच्याच बातम्या येत राहिल्या परंतु याच वेळी ८० च्या दशकातील रामायण, महाभारत, श्रीकृष्ण यासारख्या टि.व्ही.मालिंकानी जनतेला दिलासा देत त्यांच्यावर सुसंस्कार केले.

या काळात आम्ही संयमी आणि आरोग्याची काळजी घेत जीवन जगण्याची कला अवगत केली. आम्ही स्वच्छतेचे घडे गिरवू लागलो. वारंवार हात धुणे, कुठेही न थुंकणे, शिकतांना तोंडावर रूमाल धरणे यासारख्या सवयी आम्हाला लागल्या. प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी आहारावर लक्ष ठेवणे, गरज असेल तरच बाहेर पडणे, एकाच फेरीत सगळी कामे आटपणे, एखादी वस्तू नसेल तर त्याऐवजी पर्यायी वस्तूचा वापर करणे, मुलांच्या अनावश्यक सवयी थांबविणे यासारख्या गोष्टी आम्ही शिकलो. अनेक कुटुंबामध्ये पारिवारिक सुसंवाद वाढले तर काही कुटुंबामध्ये आर्थिक, विंवचनेतून मार्ग काढण्याचे कौशल्य आम्हाला प्राप्त झाले.' आजची आर्थिक बचत ही उदयाची शिदोरी आहे'. हा महामंत्र मिळाला २० लोकांमध्ये अंत्ययात्रा तर ५० जणासमवेत लग्न या संकल्पना रूजल्या. आजाराचे वैश्विक स्वरूप शास्त्रज्ञ, संशोधक ओराग्य क्षेत्रातील वैज्ञानिकांनी अनुभवले. एखादा अदृश्य विषाणू जगभर पसरून संपूर्ण जगाला विळखा घालु शकतो यावर वैदयकीय क्षेत्रासह सत्ताधारी मंडळी चिंतन करू लागली. भविष्यासाठी आरोग्याच्या योजना आखू लागले.

शेवटी भगवंत जणू आश्वासन देत होता,
सोबती रे तू तुझाच अन, तुला तूझीच साथ।
शोधूनी तुझी तू वाट चाल ऐकला।।
होवू दे जरा उशी, सोडतोस का रे धीर?
रात्र संपता पहाट  होई रे पुन्हा होई रे पुन्हा ।।

**(सीमा नितीन बाविस्कर या जि.प.शाळा खर्दे ता.शिरपूर जि.धुळे येथे उपशिक्षीका म्हणून कार्यरत आहेत.)**

सकारात्मक

# आत्मचिंतनाचे सरते वर्ष

“लॉकडाऊन मुळे माणूसच नाही तर निसर्गही रिबूट होताना आपण पाहिला.दुर्मिळ होत चाललेली पक्षांची किलबिल अगदी हाताच्या अंतरावर ऐकायला मिळत होती. कधीही दृष्टीस न पडलेले पक्षी व प्राणी यांचा वावर उभ्या मानव जातीने अंगणात उघड्या डोळ्यांनी पाहिला. हिमालया सारखा पर्वत हजारो मैलावरुन सुस्पष्ट दिसायला लागला तोही याच काळात. नद्यांचे पाणी स्वच्छ होत होते.नद्यांना नवसंजीवनी मिळत होती. हवेच्या प्रदूषणाची पातळी झपाट्याने कमी होत होती. लॉकडाऊन काळात पृथ्वीचे वातावरण चैतन्यमय झाले होते.खर तर निसर्गानेच निसर्गाचे कोडे सोडवले होते. तो प्रफुल्लित याच काळात झाला होता. पण जसा लॉकडाऊन शिथिल झाला तसा माणूस निसर्गाची धूळधाण करायला सज्ज झाला.”



**श्याम गायकवाड**
पन्हाळा-कोल्हापूर

सरत्या वर्षाच्या जल्लोषी स्वागतासाठी आपण सर्वांनी उत्साहाने पायघड्या घातल्या होत्या.नवीन वर्षात काहीतरी नवीन घडेल या आशेने अगदी धुमधडाक्यात नववर्षाचे स्वागत केले होते. पण २०२० या वर्षात न भूतो न भविष्यती अशी स्वप्नातीत गोष्ट घडेल याची पुसटशीही कल्पना मानव जातीने केली नव्हती. अगदी वर्षाच्या सुरुवातीलाच चीन सारख्या महाप्रचंड देशाला कोरोना नावाचा ड्रॅगन गिळंकृत करतो की काय अशी महाभयंकर परिस्थिती निर्माण झाली होती. अमेरिकेसारख्या विकसित समजल्या जाणाऱ्या सर्व क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या देशालाही याचा फटका एवढ्या मोठ्या प्रमाणावर बसेल याचा विचार कोणीही केला नसेल. पण जगातील सर्वच्या सर्व महासत्ता या कोरोना विषाणूपुढे अक्षरशः लोटांगण घेत होत्या.या अगोदर इतिहासात असे चित्र कधीही नोंदवले गेले नव्हते.

कोरोना विषाणूचा कहर हळूहळू आपल्या ही देशात पाय पसरायला लागला होता. बघता बघता परिस्थिती गंभीर होत चालली होती. घराबाहेर बिनदिक्कतपणे दिवसरात्र संचार करणारी माणसे अक्षरशः कुलूपबंद झाली होती. तुडुंब गर्दी असलेली ठिकाणे अगदी ओस पडली होती. शहरं असो किंवा गावं सामसूम झाली होती. तर दुसऱ्या बाजूने कोरोना रुग्णांची संख्या टॉप स्पीडने वाढत चालली होती. याचा परिणाम म्हणून रुग्णालये क्षमतेपेक्षा अधिक भरुन गेली होती. रुग्णांसाठी असणाऱ्या खाट्या अपुऱ्या पडू लागल्या होत्या. जिकडेतिकडे हाहाकार माजला असतानाच कोरोना योद्धयाची फौज या महाभयंकर रोगाशी अहोरात्र लढत होती.

कोराना काळात डॉक्टर ,परिचारिका, पोलिस, अंगणवाडी सेविका ,शिक्षक मंडळी,इ. असे अनेक कोरोना योद्धे एकमेकांच्या हातात हात घालून काम करत होती. आपल्या जीवाची पर्वा न करता ही मंडळी दिवसरात्र ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता आपले कर्तव्य इमान इतबारे करत होती. हे जोखमीचे काम करत असताना काही जणांना आपले प्राणही

गमवावे लागले . पण तरीही न डगमगता ही सर्व मंडळी तन मन धनाने काम करत राहिली. खर तर याच काळात माणूसकीची मिसाल कायम केली गेली. असंख्य देवदूत मदतीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. अनेक दानशूर मंडळी, संस्था ,मंडळे पुढे येऊन गरजू लोकांना सढळ हाताने मदत करत होते. परप्रांतीय असो वा मुळनिवासी अशा लाखो लोकांची खाण्यापिण्याची सोय अनेक समाजसेवकांनी केली. जस जमेल तशी मदत एकमेकांना केली गेली. माणसाने माणसासाठी दाखवलेले माणुसकीचे हे उदात्त दर्शन होते. जात- धर्म, गरीब -श्रीमंत असा भेदभाव न करता मनाचा मोठेपणा दाखवून अन्नछत्रे ,प्रासादालये , पाणपोया उभारुन एक नवा आदर्श समाजापुढे प्रस्थापित केला गेला. सामाजिक बांधिलकीचे व संवेदनशीलतेचे हे परमोच्च उदाहरणच म्हणावे लागेल.याला कोरोना काळाची उत्तम भेट म्हणणे वावगे ठरू नये. आपल्या सरकारने ज्या पद्धतीने परिस्थिती हाताळली ती वाखाणण्याजोगी नक्कीच होती.

लॉकडाऊन मुळे माणूसच नाही तर निसर्गही रिबूट होताना आपण पाहिला.दुर्मिळ होत चाललेली पक्षांची किलबिल अगदी हाताच्या अंतरावर ऐकायला मिळत होती. कधीही दृष्टीस न पडलेले पक्षी व प्राणी यांचा वावर उभ्या मानव जातीने अंगणात उघड्या डोळ्यांनी पाहिला. हिमालया सारखा पर्वत हजारो मैलावरुन सुस्पष्ट दिसायला लागला तोही याच काळात. नद्यांचे पाणी स्वच्छ होत होते.नद्यांना नवसंजीवनी मिळत होती. हवेच्या प्रदूषणाची पातळी झपाट्याने कमी होत होती. लॉकडाऊन काळात पृथ्वीचे वातावरण चैतन्यमय झाले होते.खर तर निसर्गानेच निसर्गाचे कोडे सोडवले होते. तो प्रफुल्लित याच काळात झाला होता. पण जसा लॉकडाऊन शिथिल झाला तसा माणूस निसर्गाची धूळधाण करायला सज्ज झाला. पुन्हा कचऱ्याचे ढीग वाढू लागले. पर्यावरणाची हानी नानाविध मार्गाने करायला तो मोकळा झाला.

कोरोना विषाणूने मानव जातीला अनेक गोष्टी शिकायला लावल्या. त्यात प्रामुख्याने वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच सामाजिक स्वच्छता ही तितकीच महत्त्वाची असते हे ध्यानात आणून दिले. वारंवार हात स्वच्छ धुणे, हस्तांदोलन करण्या ऐवजी हात जोडून नमस्कार करणे वैश्विक पातळीवर स्वीकार्य झाले.पशू पक्षी यांचे जीवन मानवामूळे कसे प्रभावित झाले याचा आरसा त्याच्यासमोर धरला तोही याच काळात. सामाजिक बांधिलकी, समाज आणि माणूसकी अशा अनेक संकल्पना मानसाने प्रत्यक्षात अनुभवल्या.

खरे पाहता मला असे वाटते की कोरोना काळानंतरही दरवर्षी एक आठवडा सक्तीचा लॉकडाऊन व्हायला हवा. जेणेकरून निसर्गालाही थोडीशी उसंत मिळेल व नव्या जोमाने नव्या स्फुर्तीने तो उभा राहिल. मानवालाही कळेल की आपण कुठे चुकतोय.निसर्गावर कुरघोडी करण्याच्या नादात आपण आपले अस्तित्व धोक्यात घालून बसत आहोत. पण निसर्गाने त्याच्या असिमित अदृश्य ताकदीने दाखवून दिले की त्याच्यासमोर आपली लायकी काय आहे. कोरोना काळाने आपल्यास बहाल केलेल्या सकारात्मक गोष्टींचे गाठोडे सोबत घेऊन मार्गक्रमण करुया. वर्षानुवर्षे करत चाललेल्या चुकांपासून धडा घेऊन नवीन वर्षाचे आनंदाने स्वागत करुया आणि एकमेकासोबत आपुलकीने मायेने जगूया आणि इतरांनाही जगू देऊया. नववर्षाच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.

**संपर्क:९७६७३००२०६**

**(श्याम सायस गायकवाड हे विद्या मंदिर उंड्री ता पन्हाळा जि कोल्हापूर येथे शिक्षक म्हणून कार्यरत.)**



# माझी शाळा

## जि.प.शाळा छाईल ता.साक्री जि.धुळे



देविदास महाले
साक्री,धुळे

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील छाईल हे एक छोटेसे गाव.या गावातील जिल्हा परिषद शाळेने गेल्या काही वर्षात लक्षणीय व उल्लेखणीय कामगिरी करत आंतरराष्ट्रीय शाळेकडे आपली वाटचाल केली आहे

या शाळेने गेल्या २ वर्षात सुमारे ११ लक्ष रुपयांचा लोकसहभाग देणगी व वस्तूस्वरूपात मिळवला आहे. त्यात शाळेचे भव्य प्रवेशद्वार,संगणक लॅब (फर्निचरसह) ,सौरसंच,पाण्याचे प्युरीफायर,सर्व वर्गात led tv, प्रोजेक्टर, प्रिंटर,लॅमीनेशन मशीन आदी महत्वाच्या वस्तूंचा समावेश आहे.त्यामुळेच की काय शाळेच्या पटात सुद्धा लक्षणीय वाढ झाली आहे .सन २०१४-१५ साली १३४ चा पट वाढत वाढत १६८ पट वाढविला आहे. छाईल शाळेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अनेक वैशिष्ट्य पूर्ण उपक्रम राबविले जातात त्यात कला,कार्यानुभव विषयातील वस्तूंचे प्रदर्शन, प्रकल्प प्रदर्शन, दहीहंडी, सजीव पुतळे, कार्यक्रम, राख्यांचा स्टॉल, बाल आनंद मेळावा, बौद्धिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, इ अनेक उपक्रमाचा समावेश आहे .या सर्व स्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रोत्साहनपर व उत्कृष्ट स्पर्धकांना प्रथम ,द्वितीय या अनुक्रमाप्रमाणे बक्षीस वाटप होतात.

आमच्या छाईल शाळेत कृतीयुक्त अध्यापन ,व शिक्षणाचे व्यवहारात उपयोजन या दोन गोष्टीवर अधिकाधिक भर दिला जात असतो.त्यासाठी विद्यार्थ्यांची आठवडे बाजारास भेट,शेती क्षेत्राला भेट,उद्योगसमूहास भेट,इ उपक्रम दरवर्षी राबविले जातात.

छाईल शाळेची उल्लेखणीय बाब म्हणजे शाळेत दरवर्षी पुस्तकांप्रमाणे वह्यासुद्धा मोफत मिळतात..शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या देणगीचा चढता आलेख आपणांस दिसून येतो. या वर्षी शाळेने सांस्कृतिक कार्यक्रम गावाच्या मंदिरात ठेऊन २०००० पर्यंत देणगी मिळवली आहे .

शाळेत शैक्षणिक साहित्य निर्मितीत एक अनोखा पॅटर्न

राबवत प्रत्येक विद्यार्थ्याला साहित्य हाताळायला मिळावे या करिता विद्यार्थी संख्ये एवढे एकाच प्रकारचे शैक्षणिक साहित्य बनविण्याचे धोरण ठेवले आहे.त्यामुळे अध्ययन जलद व सुकर होते असे निदर्शनास आले आहे.

शाळेत सुसज्ज असे ग्रंथालय आहे त्यात दरवर्षी लोकसहभागातून पुस्तके मिळवून भर घातली जाते.

शाळेचा वैविध्यपूर्ण परिपाठ हे देखील आमच्या शाळेचे एक अनोखं वैशिष्ट्ये आहे त्यात सर्व वर्गातील गुणवत्ता तपासण्यासाठी इयत्तानिहाय प्रश्न विचारले. जातात.त्यावरून कोणत्या वर्गाची गुणवत्ता अधिक आहे ही एक निकोप स्पर्धा शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये सुरू असते.विद्यार्थी गैरहजेरी बाबत मुख्याध्यापक यांच्याकडून दररोज आढावा घेऊन दररोज गैरहजर विद्यार्थ्यांच्या घरी मुख्याध्यापक भेट देतात .त्यामुळे गैरहजेरीचे प्रमाण कमी झाले.

या सर्व कामांची दखल घेत शाळेस महाराष्ट्र शिक्षक पॅनल तर्फे २०१८-१९ चा आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त झाला आहे व ग्रामपंचायत छाईल ने देखील वेळोवेळी सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांचा सत्कार केला आहे.

वरील सर्व उपक्रम, कार्यक्रम ,कामगिरी करून घेण्यात आमच्या शाळा व्यवस्थापन समितीचा सिंहाचा वाटा आहे.शाळा व्यवस्थापन समितीमार्फत शालेय गुणवत्तेची व शिक्षक, मुख्याध्यापक कामगिरीची तपासणी  वेळोवेळी होत असते . शाळेच्या सर्व उपक्रमात शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष , सदस्य, यांचा सक्रिय सहभाग व सहकार्य असते. शाळेने मागील ४ वर्षांपासून शाळा सिद्धी कार्यक्रमात आपली अ श्रेणी टिकवून ठेवली आहे .शाळेचे मुख्याध्यापक डी डी महाले सर हे नेहमी शाळा व्यवस्थापन समिती ,ग्रामपंचायत छाईल ,व गावातील गावकरी ,पालक यांच्याशी समन्वय साधून शाळेची विविध कामे पार पाडत असतात.

भौतिक सुविधेच्या बाबतीत सांगायचे झाले तर RTE ऍक्ट नुसार सर्व भौतिक सुविधा शाळेत उपलब्ध व सुस्थितीत आहेत तसेच या वर्षी म्हणजे २०२०-२१ ला शाळेस ७ लक्ष एवढा क्रीडांगण विकास निधी प्राप्त झाला असून शाळेने उत्कृष्ट,अत्याधुनिक असे क्रीडांगण तयार करून सर्व प्रकारचे क्रीडासाहित्य विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहे .विद्यार्थी सुरक्षिततेसाठी शाळेने शालेय आवारात लोकसहभागातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. शाळेने केलेली प्रगती, कामगिरी केली त्यात आमच्या नाडसे केंद्राच्या केंद्रप्रमुख मॅडम एल.डी सोनवणे यांचाही मोलाचा वाटा आहे. शिक्षकांचा कामाचा उत्साह वाढवा यासाठी त्या नेहमी प्रोत्साहन देत असतात व चांगले काम करणाऱ्या शिक्षकांचा केंद्रात सत्कार हा एक अभिनव उपक्रम राबवत त्यांनी छाईल शाळेच्या सर्व शिक्षकांचा सत्कार केला आहे. त्यामुळे आमच्या शाळेतील  शिक्षकांना प्रेरणाच मिळाली.

सध्याच्या कोरोनामय काळात  शाळा बंद असताना शाळेने १०० हुन अधिक विद्यार्थी ऑनलाईन ,४० हुन अधिक विद्यार्थी tv रेडिओ  व उर्वरित छापील अभ्यासिकेद्वारे शिक्षण शिक्षणप्रवाहात टिकवून ठेवले आहेत. शाळेत मागील काळात अजूनही बरेच वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. दफ्तरमुक्त शनिवार,विद्यार्थी निर्मित गणपती मूर्ती प्रदर्शन, भाज्यांचे प्रदर्शन, फुलांचे प्रदर्शन, दिनांकानुसार पाढे पाठांतर,सामान्य ज्ञान स्पर्धा, करपल्लवी ,प्रजासत्ताक दिनानिमित्त संचालन व ससाधन कवायत, परसबाग, पाककृती स्पर्धा,इ.यासह विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना नवनवीन अनुभव देण्याचा नेहमीच प्रयत्न करतो आहोत.

**संपर्क : ९४२०१४३२८५**

# माझी शाळा

## जि.प.शाळा बभळाज ता.शिरपूर जि.धुळे






**किरण पाटील**
शिरपूर,धुळे

'मेहनत इतनी खामोशी से करो की सफलता शोर मचाये.' याची काहीशी अनुभूती आम्हास लाभली सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात. गेल्या चार वर्षापासून नव्याने रुजू झालेले सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती बभळाज, ग्रामपंचायत बभळाज, पालक, विद्यार्थी आम्ही सर्वांनी मिळून जे परिश्रम घेतले याची फलश्रुती विविध पुरस्काराच्या माध्यमातून मिळण्याचे सौभाग्य आम्हास प्राप्त झाले. जिल्हा परिषद धुळे मार्फत देण्यात येणारा सन २०१९-२० या वर्षीचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार शाळेचे मुख्याध्यापक वासुदेव चाचरे यांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वान्मथी सी. मॅडम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पूज्य साने गुरुजी जयंती निमित्त महाराष्ट्र शिक्षक संघटना धुळे यांच्या मार्फत देण्यात येणारा सन २०१९-२० या वर्षीचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार किरण पाटील अर्थात मला मा. जिल्हाधिकारी गंगाथरण डी. साहेब यांच्या हस्ते प्राप्त झाला. एस के डी चॅरिटेबल ट्रस्ट व गिरणा गौरव प्रतिष्ठान नाशिक यांच्या मार्फत देण्यात येणारा सन २०१९-२० या वर्षीचा आदर्श शाळा पुरस्कार जि. प. प्राथमिक शाळा बभळाज ला प्राप्त झाला. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद शाखा- शिरपूर यांच्या मार्फत देण्यात येणारा सन २०१७-१८ या वर्षीचा गुणवंत शाळा पुरस्कार मा. अध्यक्ष जि.प.धुळे श्री तुषारदादा रंधे यांच्या हस्ते जि. प. शाळा बभळाजला प्राप्त झालेला आहे. सन २०१६-१७ मध्येच जि. प. बभळाज शाळेने खडज ९००१ हे आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त केले आहे. विशेषतः गुणवत्तेवर आधारित तालुकास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेत २०१९-२० या वर्षी बभळाज शाळेतील विद्यार्थी रोहन बंजारा व दिक्षित बंजारा यांनी प्रथम क्रमांक पटकावून शाळा व गावाची शान वाढवली. तसेच मा. माजी शालेय शिक्षण मंत्री व विद्यमान आमदार श्री अमरीशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत ग्रामीण गटातून प्रदिप बंजारा या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.

यासोबतच दरवर्षी प्रमाणे सन २०१९-२० या वर्षी तालुकास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमात बभळाज च्या विद्यार्थ्यांनी सर्वोत्कृष्ट नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. ही विविधांगी यशप्राप्ती म्हणजे आम्हा सर्वांच्या एकजुटीचं व अथक परिश्रमाचं फलित आहे. शिरपूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा.एस सी पवार, होळनांथे बिटाचे शिक्षण विस्तार अधिकारी मा. बी.एस.बुवा, तरडी केंद्राचे केंद्रप्रमुख मा. प्रविण मराठे सर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा मनिषा रविंद्र जाधव या सर्वांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे हे होऊ शकलं.

भौतिक सुधारणांच्या बाबतीत शाळेची यशस्वी वाटचाल-

सन २०१५-१६ मधील शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांनी एक सुसज्ज शालेय इमारत व क्रीडांगण निर्माण करून शालेय प्रगतीची मुहर्तमेट रोवली. झरनोसे मधुर संगीत ना होता गर उनकी राहो मे पत्थर ना होते. संकटे आली पण त्यावर मात करून संघर्ष सुरूच ठेवला. शाळा पूर्ण खडकाळ भागात होती. तासनतास जेसीबी वापरून शालेय मैदान सपाट करण्यात आले. एक देखणी, सुसज्ज अशी इमारत व क्रीडांगण तयार करण्यात आले. या पारदर्शी व्यवहारातून पैसे वाचवून त्यातूनच शाळेला २४ तास पाण्याची व्यवस्था, हॅण्ड वॉश स्टेशन, तारेची संरक्षण भींत, मुख्याध्यापक कार्यालय,आकर्षक रंगरंगोटी व मुलांसाठी सुसज्ज खेळणी निर्माण करण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत एक युनिट व ग्रामपंचायत बभळाज मार्फत एक युनिट असे दोन युनिटचे प्रशस्त स्वच्छतागृह तयार करण्यात आले. सन २०१७-१८ मध्ये ग्रामपंचायत बभळाज मार्फत प्रोजेक्टर व सी पी यु सह दोन वर्गखोल्या डिजिटल करण्यात आल्या. तसेच सन २०१९-२० मध्ये स्वतंत्र भोजन कक्ष व सुसज्ज साऊंड सिस्टीम ही उपलब्ध करून देण्यात आली. सन २०२०-२१ मध्ये तर डिजिटल वर्गासाठी सौरऊर्जा प्रकल्प व संगणक संच ग्रामपंचायत ने उपलब्ध करून दिले. यासाठी बभळाजचे सरपंच मा. जगन्नाथ महाजन यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. या वर्षी पुन्हा एकदा रंगरंगोटी व दोन वर्गखोल्या दुरुस्त करण्याचा मानस आहे. एकंदरीत भौतिक सुधारणांच्या बाबतीत शाळेची पूर्णत्वाकडे वाटचाल सुरूच आहे.

विविध सहशालेय उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी-

१.वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन- गेल्या चार वर्षात सव्वाशे च्यावर झाडे शालेय प्रांगणात लावली व १००% जगवली याचा आम्हाला अभिमान आहे. बॉटल पाम व इतर बरीच फुलझाडे शिक्षकांनी स्वखर्चाने उभारली आहेत. याकामी शिक्षक, विद्यार्थी यासोबत शाळेतील स्वयंपाकी सुनितातांई यांचीही मोलाची साथ आहे. याचाच एक भाग म्हणून मागील वर्षी ३००० seed balls बनवण्याचा आगळावेगळा उपक्रम गावातील तरुणांच्या मदतीने राबविला.ज्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शालेय बाह्यांग सुशोभिकरणासोबत पर्यावरण जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम यशस्वी ठरला आहे.

२.शैक्षणिक सहली व क्षेत्रभेटी- विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूतीतून दिलेले शिक्षण आनंददायी व चिरकाल टिकणारे असते. याच उद्देशाने आम्ही दरवर्षी सहली व क्षेत्रभेटींचे आयोजन करत असतो. आतापर्यंतच्या क्षेत्रभेटीतून विद्यार्थ्यांना विद्युत उपकेंद्र ,वीटभट्टी, हॉटेल व्यवसाय, विविध दुकाने, पेट्रोल पंप, सुतारकाम, बँक, धार्मिक स्थळे, पोस्ट, शिरपूर पॅटर्न बंधारे, शेतीव्यवसाय इ. ठिकाणांची प्रत्यक्ष अनुभूती दिली. सन २०१७-१८ मध्ये दौलताबाद

किल्ला, वेरुळ लेणी, घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग, औरंगाबाद शहर या ठिकाणी सहल काढली. सन २०१८-१९ मध्ये अजिंठा लेणी, नांदुरा(मारुती), खामगाव (पार्ले फॅक्टरी), शेगाव व आनंदसागर याठिकाणी सहल नेली. सन २०१९-२० मध्ये नाशिक शहर, पंचवटी, तारांगण, त्र्यंबकेश्वर, पांडव लेणी, फाळके स्मारक, गार्डन इ. ठिकाणी सहल काढली. या विविध ठिकाणांच्या भेटीतून विद्यार्थ्यांना विलक्षण आनंदासोबत सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, वास्तविक ज्ञानाची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली.

३.गुणवत्तापूर्ण शिक्षण-

प्रत्येक शाळेचे अंतिम ध्येय असते गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, वाढवणे व टिकवणे. त्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केलेला आहे. ज्ञानरचनावादी संकल्पनेतून शिक्षण, डिजिटल क्लासरुमच्या माध्यमातून शिक्षण, प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण, संगणक शिक्षण, भाषा गणित इंग्रजी पेट्यांच्या साहित्याच्या माध्यमातून शिक्षण, नवोपक्रमातून शिक्षण, विविध स्पर्धा, गट, चर्चा, कला, क्रीडा, स्वयंअध्ययन इ. वैविध्यपूर्ण पद्धतीने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. वेध धुळे या गृप च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोठमोठी आव्हाने देणे व पूर्ण करणे हा उपक्रमदेखील तितकाच फलदायी आहे जो विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षण विचाराकडे नेऊ पाहत आहे. शासनाच्या विविध योजना व शिष्यवृत्या यांचा १००% विद्यार्थ्यांना लाभ दिलेला आहे.

४. इतर यशस्वी उपक्रम -

शालेय विद्यार्थ्यांचा गीतमंच गृप असून डिजिटल ट्रॅकवर व लाईव्ह प्रार्थना, राष्ट्रगीत, ध्वजगीत व इतर गीतांचे सादरीकरण विद्यार्थी प्रभावीपणे करतात. विद्यार्थ्यांच्या कृतियुक्त कविता YouTubeda upload केलेल्या आहेत.

अवकाशा विषयी गोडी निर्माण होण्याच्या दृष्टीने विद्यार्थांना शाळेत प्रत्यक्ष सूर्यग्रहणाची अनुभूती दिली. शिवाय नासाच्या मंगळ मोहिम २०२० साठी सर्व विद्यार्थ्यांच्या नावांची नोंदणी करून त्यांची नावे मंगळावरील पाऊलखुणा या रूपाने अजरामर झाली.

बँक व्यवहार समजणे व बचत करणे या उद्देशाने विद्यार्थी बचत बँक सुरू असून त्यात जमा, रोखे इ. व्यवहार विद्यार्थी स्वतः करतात.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाच्या हेतूने कवायत, योगाभ्यास इ. नियमितपणे घेतले जातात. विद्यार्थ्यांचे बँडपथकही नेहमी सक्रिय असते.

विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने विद्यार्थ्यांना वाचनासाठी अवांतर पुस्तके दिली जातात. नोंदी अद्ययावत ठेवल्या जातात.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वक्तृत्व, गायन, हस्ताक्षर, चित्रकला, रांगोळी काढणे, मेहंदी काढणे, क्रीडा इ. विविध स्पर्धा सातत्याने घेतल्या जातात.

इंग्रजी संदर्भात 'We learn English' हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना बोलतं करण्याचा प्रयत्न केला आहे.

दरवर्षी तालुकास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी नृत्याविष्कार सादर करतात.

सांस्कृतिक मूल्यांची रुजवणूक करणे- विद्यार्थी झालेल्या चुकांची कबुली राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या प्रतिकात्मक पुतळ्यासमक्ष देतात व पुन्हा अशी चूक होणार नाही असे प्रण घेतात.

बेटी बचाओ बेटी पढाओ या उपक्रमांतर्गत मुलींना थोर महिलांचे पोशाख परिधान करणे, त्यांची घोड्यावर मिरवणूक काढणे, स्थानिक कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करणे, महिला मेळावा आयोजित

करणे इ. कार्यक्रम यशस्वीपणे राबविले आहेत.

तंबाखूविरोधी जनजागृती करण्याच्या हेतूने तंबाखूमुक्त शाळा अंतर्गत तंबाखूचा प्रतिकात्मक पुतळा तयार केला. त्याची गावातून मिरवणूक काढून त्याचे गावातील चौकात दहन केले.

सांस्कृतिक विकासाच्या उद्देशाने विविध सण, उत्सव तथा थोर महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी आनंदाने साजरी केली जातात.

जेव्हा इतर शाळा व विद्यार्थी आमच्या शाळेस भेट देतात तेव्हा विलक्षण आनंद तर होतोच शिवाय वाढलेल्या जबाबदारीची जाणीवही होते. एक सांगावसं वाटतं की, जीवन हे संघर्ष आहे. अनेकदा परिस्थितीशी लढावं लागतं. निष्ठेने, प्रामाणिकपणाने व योग्य दिशेने परिश्रम घेतल्यास आपण यशाचा डोंगर निश्चित गाठू शकतो. दर्द सबका एक हैं.. हौसले मगर अलग हैं.. कोई टूट के बिखर जाते हैं.. कोई संघर्ष करके निखर जाते हैं.. खूप काही केल्याचा आविर्भाव नाही. कारण परिपूर्ण कुणीच राहत नाही. शाळा विकासाचा ध्यास घेतला आहे. त्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत व निरंतर सुरूच राहणार आहेत.कोरोनाच्या सावटाखाली शैक्षणिक सत्र २०२०-२१.

या वर्षी न भूतो न भविष्यती असं कोरोनाचे संकट समस्त जगावर ओढवलं. त्याची झळ शाळा व शिक्षणाला सुद्धा पोचली. शाळा बंद पण शिक्षण सुरू या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना व्हॉट्स ॲप गृप, झूम मीटिंग, यू ट्यूब व्हिडिओ, गल्लीमित्र, पालकभेटी इ. द्वारे शिक्षण दिले जात असले तरी प्रत्यक्ष दिले जाणारे शिक्षण यात खूप फरक आहे. या चिमुकल्यांच्या किलबिलाटाने शालेय वातावरण न्हाऊन निघतं. शालेय प्रांगण जणू ओस पडल्यासारखं वाटत आहे. शालेय भिंती जणू खुणावताहेत, 'या चिमण्यांनो परत फिरा रे.' आपण ईश्वराला हीच प्रार्थना करूया की, सर्वांना या संकटातून मुक्त कर व पुन्हा या शाळा चिमुकल्यांच्या हास्याने सजू देत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ओळी मुखावर येतात की,

पुन्हा बहरू दे निसर्ग ..
पुन्हा शुद्ध होऊ दे हवा पाणी..
शांत तृप्त मन प्रसन्न अवनी...

**संपर्क-९०४९१३७७१८**

**(किरण देविदास पाटील हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बभळाज ता. शिरपूर जि.धुळे येथे उपशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.)**

---


## *हाक*

गर्भातील भ्रुण देते आईस हाक
नको ग गर्भपाताचा दाखवू मला धाक
मुलाची पाहिली, आई असते सखी
मुलगीच असेल तर तिच्यासारखीच दुःखी
मुलीला जन्माला घालण्याच असेल तिच्यात बळ
तर मुलीचा कुणीच करणार नाही तिचा छळ
कुणीच करणार नाही तिच्यात छळ



**- अजंता दयानंद लोंढे**
**जि.प. शाळा खलाटी**
**ता.जत. जि. सांगली**

# भारतीय अस्मिता






मयुरी संदीप पाकळे
धुळे

प्रत्येक भारतीयांसाठी आनंदाचा सन्मानाचा उत्साहाचा दिवस म्हणजे प्रजासत्ताक दिन म्हणजेच संविधान लागू केल्याचा दिवस !

' नसे फक्त पुस्तक हा भारतीय धर्मग्रंथच समृद्ध संविधान बनले देशाचे! सुज्ञ पालक! गुलामगिरी संपली, आले गनराज्य सत्ताधारी बनले चालक, जनता झाली मालक'प्रजासत्ताक दिवस म्हणजे तो दिवस ज्या दिवशी गुलामगिरीत खितपत पडलेला प्रत्येक भारतीय या देशाचा मालक झाला. ते दिवस ज्या दिवशी प्रत्येक भारतीयाला पवित्र आणि समृद्ध असे संविधान मिळाले. भारतीयाच्या हातात सत्ता आली. देशाची सर्वात मोठी लोकशाही अवतरली. भारत देश हा एक लोकशाही प्रणित गणराज्य बनले.

'लोकांचे, लोकांनी आणि लोकांसाठी चालवलेले जनतेचे राज्य म्हणजे गणराज्य!' आज आपण जे गणराज्य अनुभवत आहोत. त्याच्या निर्मितींसाठी ज्या क्रांतीकारकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले अशा थोर व्यक्तींना कोटी कोटी प्रणाम !

दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असले, तरीही देशातील लोक सैरभैर झालेले होते. विभिन्न, तुकड्यात देश विभागलेला होता. अशा दिशाहीन व भरकटलेल्या देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक होती नियमावली ! भारतीय म्हणून पाळावयाचे नियम.

आपल्या भारत देशात सर्वांना शांततेत सुखसमाधानाने जगा यावे स्वातंत्र्याचा आनंद घेत घेत नांदता यावे म्हणून सविधान निर्मितीचे महान कार्य सुरू झाले.

प्रजासत्ताक दिन सांजरा करण्याचे मुख्य कारण म्हणजे 'संविधान होय!' भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबडेकर डॉ.राजेंद्र प्रसाद आणि संपूर्ण मसुदा समितीच्या सदस्याची निर्मितीची जबाबदारी २ वर्षे ११ महिने आणि १७ दिवसात पूर्ण केले.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी अधिकृतपणे संविधानाचा स्विकार करण्यात आला २६ जानेवारी १९५० रोजी अंमलबाजावणी करण्यात आली.

संविधानानुसार भारत देश सार्वभौम,समतावादी,

धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य बनला जो न्याय, समानता, स्वातंत्र्य बंधूत्व यांना चालना देत असतो. परंतु आज देशातील जातीयवाद, जातीय दंगली दहशतवाद, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, महिलांवरील अत्याचार वगैरे, वगैरे पाहिल्यास प्रश्न पडतो की, हाच तो क्रांतीकारकांचा स्वप्नातला भारत का? याचसाठी महापुरूषांनी स्वातंत्र्य मिळवून दिला आहे का?

नक्कीच नाही मित्रांनो! प्रजासत्ताक देशाचे पावित्र्य आपण सर्वांनी राखलेच पाहिजे. संविधानाने दिलेले अधिकार जसे आपल्याला माहित आहेत. तसे कर्तव्य ही आपण जाणून घेतले पाहिजे व त्याचा आदर केला पाहिजे.

चला तर मग देशाची समस्या ही आपली समस्या आहे असे समजून ती दूर करण्याच प्रयत्न करूया. देशाचा प्रत्येक देशबांधव माझा बांधव आहे. असे वागून संविधानाचा सन्मान करूया. सर्वच क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा नायनाट करूया, आपली लोकशाही बळकट करूया, आपल्या भारतमातेला अभिमान वाटेल असे वागूया.

**(मयुरी संदिप पाकळे जि.प. प्राथ शाळा, सरवड ता.जि. धुळे येथे उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.)**

---

## चार खांदे

ओळखीचे चार खांदे भार त्यांनी पेललेला
जीवनाचा डाव होता आज कोणी हारलेला

थांबलेल्या माणसाची जात नव्हती पाहिलेली
हात होता फक्त माथी सावलीने ठेवलेला

वाकलेले झाड आहे हे फळांनी लगडलेले
होय विष्टेतून दाणा पाखराने पेरलेला

विस्तवावर भाळल्याने राख झाली जीवनाची
जीवघेणा डाव होता कोळशाने खेळलेला

अर्भकाचा गाल दिसतो तू सकाळी उगवल्यावर
शांत शीतल वस्त्र भगवे वाटतो रे नेसलेला

कुशलतेने जोडलेले तलम धागे विणकऱ्याने
ताणल्याने तुटत जातो तोच धागा जोडलेला

मी समजलो माणसाला तुच्छ येथे दगड पुजला
हो परंतू माणसातच देव मजला भेटलेला

**अशोक भांबुरे, धनकवडी,**
**८१८००४२५०६**

## वेचावे ज्ञानकण

वेचावे ज्ञानकण
सरावे तिमीर व्यापावे गगन
वेचावे तेजकण भास्करासम
सरावे अज्ञान व्हावे सृजन
वेचाने ज्ञानक भ्रमरासम ।।१।।

सरावे दीनपण यावे शहाणपन
वेचावे शब्दकण ग्रंथासम
वेचावे ज्ञानकण भ्रमरासम ।।२।।

सरावे कोरेपण फुलावे शब्दसुमन
वेचावे अक्षरकण अध्ययनासम
सरावे अविद्या रूजावे वाचनलेखन
वेचावे ज्ञानकण भ्रमरासम ।।३।।

**सारिका निशांत रंधे**
**शिरपूर,धुळे**

शिक्षणयात्री

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.


६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट – शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

संपर्क :शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे चलभाष : 8208301001 shikshanyatri11@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2018-20










# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

With pay any app

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2018-20

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ..................................................
..................................................
..................................................

Pragati Arts Shirpur 8421356261